

# – प्रकरण पाचवे –

# क्षेत्रीय पाहणीचा अहवाल समस्या व उपाय





# प्रकरण पाचवे

## क्षेत्रीय पाहणीचा अहवाल
## समस्या व उपाय

- अनुक्रमणिका -


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ५.१ | प्रस्तावना | ११६ |
| ५.२ | समस्यांचा शोध | ११७ |
| ५.३ | समस्या स्वरुप | ११८ |
| ५.४ | क्षेत्रीय पाहणीचा अहवाल | ११९ |
| ५.५ | विश्लेषण | १२१ |
| ५.६ | उपाय | १४८ |
| ५.७ | समारोप | १६० |
| | संदर्भसूची | १६२ |

# - प्रकरण पाचवे -

## क्षेत्रीय पाहणीचा अहवाल, समस्या व उपाय

### ५.१ प्रस्तावना

चित्रपट हे एक अत्यंत प्रभावी असे दृक्‌श्राव्य माध्यम आहे. प्रेक्षकांना बंदिस्त करण्याचे, भावनात्मकरीत्या खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य या माध्यमात आहे. या माध्यमांमुळे माहिती, शिक्षण आणि मनोरंजन ही तीनही कार्ये प्रभावीपणे घडतात. त्यामुळेच मार्शल मॅक्लुहानने चित्रपट माध्यमास- 'जादुची चटई' Magic Mat असे संबोधले आहे...१

नवीन सहस्रकात माहीती रंजनाला पुन्हा एकदा महत्त्व आले आहे. त्यामुळेच चित्रपट माध्यम हे दूरचित्रवाणीप्रमाणेच आपले प्रभुत्व राखून आहे.

चित्रपट व्यवसाय हा नवीन आणि तेवढ्याच प्रभावी अशा कल्पनांवर आधारलेला आहे. सध्याच्या मराठी चित्रपट निर्मितीमध्ये हा सृजनशीलतेचा आविष्कार किती आणि कसा आहे आणि बॉक्स आफिसवर त्याचा किती आणि कसा परिणाम घडतो हा अत्यंत महत्त्वाचा विषय बनून गेलेला आहे.

चित्रपट या माध्यमाची क्षमता स्पष्ट करताना माधव शेवाळे म्हणतात,

**''चित्रपट हे कलात्मकता आणि तंत्रज्ञान यांचा संगम असलेले माध्यम असून लोकरंजन व लोकशिक्षणाचं प्रभावी माध्यम आहे. चित्रसंवाद व अभिनयाच्या सहाय्याने कथानक सांगणं ही जशी दृष्यकला आहे तशी श्राव्यकलाही आहे.''...२**

नवीन सहस्त्रकात तर यांत्रिकीकरणाच्या अतिरेकामुळे मनोरंजनाला अधिक महत्त्व आले आहे. त्यामुळेच स्थानिक पातळीपासून वैश्विक पातळीपर्यंत चित्रपटांचा प्रभाव वाढत आहे. या संदर्भात माधव शेवाळे भाष्य करतात की,

**''मनोरंजन, उद्‌बोधन, स्वप्नरंजन, प्रचार, आत्मविष्कार आणि जीवनभाष्य इ. हेतू या चित्रपट माध्यमाच्याद्वारे प्रभावीपणे मांडता येतात व पाहता येतात.''...३**

आधुनिक काळात जीवनभाष्य ह्या कल्पनेला विशेष महत्व आले आहे; कारण जीवनसंघर्ष जसा बिकट होत आहे तसा चित्रपटांचा आशयसुद्धा व्यामिश्र बनत चालला आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधात मराठी चित्रपटाच्या वाटचालीचा अभ्यास करतानाच मराठी चित्रपट निर्मितीच्या समस्यांचा शोध घ्यावयाचा आहे. यासाठी इ.स. २००० पासून पुढील मराठी चित्रपटांचा अभ्यास करुन, विशेष लक्ष २००१ ते २००५ या कालावधीतील मराठी चित्रपट निर्मितीकडे दिले आहे व त्यातून विविध समस्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## ५.२ समस्यांचा शोध

मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील समस्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न येथे करण्यात आला आहे. दादासाहेब फाळके, बाबूराव पेंटर या दिग्गजांपासून आजच्या काळाच्या निर्मात्यांच्या निर्मितीकडे पाहिले असता कोणती ना कोणती समस्या भेडसावत असलेली दिसून येते.

मराठी चित्रपट निर्मात्यांना प्रारंभी चित्रीकरण कलेच्या तंत्रापासून सर्वच गोष्टी नव्या होत्या; परंतु अभ्यासू वृत्तीने आणि 'चुका व शिका' या न्यायाने त्यांनी आपले मार्गक्रमण जिद्दीने आणि चिकाटीने केले.

म्हणजे सुरुवातीच्या काळात निर्मात्यांना तंत्रच मुळात माहीती नसल्याने तंत्रशिक्षणा-पासून निर्मितीच्या सर्व अंगोपांगांचा अभ्यास डोळ्यात तेल घालून करावा लागला.

भांडवलाची समस्या तर अगदी मराठी चित्रपटाच्या पाचवीलाच पुजलेली. या समस्येने सतत मराठी चित्रपट निर्मितीचा पाठपुरावा केलेला आहे. स्वत:चे भांडवल, भागिदारी, कंपनीची निर्मिती, भागभांडवलाच्या आधारे वित्तसहाय्य मिळविणे, बँका, पतसंस्था आणि सरकार यामार्फत वित्तसहाय्य मिळविणे अशा विविध थरांवरून भांडवलाची समस्या सोडविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

कच्च्या मालाचा पुरवठा (Raw stock) - मध्यंतरी महायुद्धाच्या काळात व त्यानंतर याबाबतीत मोठ्याच अडचणी निर्माण झाल्या होत्या.

नवनवीन सुधारणांनी नव्या नव्या समस्यांनाही जन्म दिला. ध्वनीच्या आगमनामुळे मूकपटांवर गदा आली आणि नव्याच समस्या निर्माण झाल्या. या बाबतीत माधव शेवाळे म्हणतात,

**''नव्याने स्थापत्यशास्त्र निर्माण करण्याची गरज भासली. स्टुडिओ व**

**चित्रपटगृहांची पुनर्रचना करणे अटळ झाले. ध्वनी विस्तारक यंत्र, तंत्रज्ञ, कलावंत, भाषा, शद्बोच्चार, आवाजाची जात, दर्जा, गायन इत्यादी नवे प्रश्न उभे राहिले. बंदिस्त स्टुडीओत चित्रण करावे लागले... गीतकार, संगीतकार व पार्श्वगायक या त्रिकुटांचा जन्म झाला.'' ...४**

मराठी चित्रपटांना प्रथम नाटकांना, नाटकांच्या लोकप्रियतेला टक्कर द्यावी लागली. त्यानंतर इतर भाषिक चित्रपटांशी स्पर्धा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे हिंदी चित्रपटांशी स्पर्धा. हिंदी चित्रपटांतील अफाट भांडवल आणि त्यामुळे त्याचे समृद्ध चित्रीकरण, रंगीबेरंगी दुनिया, परदेशातील चित्रीकरण स्थळे इ. सर्वांशी स्पर्धा करणे ही अवघड बाब बनली.

मराठी चित्रपटांना तारण्यासाठी शासनही पुढे सरसावले. कर परतीपासून सुरुवात करून आता अनुदानापर्यंतची वाटचाल पाहता- निर्मिती संख्यात्मकदृष्ट्या वाढली आणि गुणात्मकदृष्ट्या दर्जा घसरला. वाढत्या निर्मितीमुळे चित्रपटगृहे कमी पडू लागली. चित्रपट निर्मितीसंख्या वाढली पण प्रदर्शन करण्याची अड्चण निर्माण झाली.

विविध कलाकार आणि तंत्रज्ञ यांची संख्या वाढली. वाढत्या निर्मितीमुळे एकच कलाकार एकाचवेळी अनेक निर्मितीसंस्थांना बांधला गेला. त्यामुळे कलावंतच नव्हे तर तंत्रज्ञांनाही चित्रिकरणाच्या वेळा पाळण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. या पूर्वीच्या प्रकरणात यावर सविस्तर प्रकाश टाकणेत आला आहे.

अशा विविध समस्यांचा शोध घेण्यासाठी विविध ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, चरित्र, आत्मचरित्र इ. साहित्याचा अभ्यास करून समस्यांची निश्चिती करण्यात आली. तसेच समाजातील विविध जाणकार, प्राध्यापकवर्ग, पत्रकार तसेच तंत्रज्ञ कलाकार यांच्या मुलाखतीतून माहीती घेऊन विविध समस्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

## ५.३ समस्या स्वरूप

समस्या ही बऱ्याच वेळेला निर्मितीच्या मार्गात अडथळा किंवा अडसर बनते. कधीकधी समस्या ही नवीन शोध करण्यासाठी प्रवृत्त करते. समस्येमुळे जिज्ञासा वाढते आणि जिज्ञासातृप्तीसाठी व्यक्ति प्रयत्नशील बनते. समस्या निवारण्याचे प्रयत्न करायला

- लागते. यातून समस्यापूर्ती तर होतेच, पण यशाकडे जाण्याच्या विविध मार्गांचा परियच होतो.

कॅमेऱ्याची समस्या निर्माण झाली तेव्हा बाबूराव पेंटर यांनी कॅमेऱ्याच्या अंतर्गत रचनेचा अभ्यास करून इथंच कोल्हापूरात व्यवस्थित चित्रीकरण करू शकेल असा कॅमेरा तयार केला आणि या कॅमेऱ्याने कितीतरी चित्रपटांचे चित्रीकरण करण्यात आले.

सुरुवातीला नाटकात स्त्री भूमिका पुरुषच करायचे. नाटक, सिनेमा यात काम करणे कुलीन, घरंदाज स्त्रियांना त्यावेळी अवघड वाटत होते. कमीपणाचे काम वाटत होते, त्यामुळे नाटकात व सुरुवातीच्या सिनेमात या समस्येवर उपाय म्हणून पुरुषच स्त्रियांच्या भूमिका करत असत. पुढे पुढे कलावंतीणी, वेश्या वगैरेंना आग्रह करून चित्रपटात कामे करायची विनंती करीत. अशातच दुर्गा खोटेंसारख्या घरंदाज, कुलीन स्त्रीने 'अयोध्येचा राजा'मध्ये भूमिका केली.

भांडवल समस्या वेगवेगळी रूपे घेऊन समोर आली तर त्या त्या काळातील चित्रपट निर्मात्यांनी त्यावर तोड काढली आणि चित्रपट निर्मिती केली.

प्रत्येक काळात त्या त्या समस्या वेगवेगळ्या पद्धतीने समोर येत गेल्या व त्यावर तोडगा काढतच चित्रपटनिर्मिती पुढे पुढे सरकत राहीली.

## ५.४ क्षेत्रीय पाहणीचा अहवाल

मानव समाजशील प्राणी आहे. पिढ्या न् पिढ्या त्याचे कलेशी नाते जोडलेले आहे. साहित्य, संगीत, नाट्य, चित्रकला इ. अनेक कलांचा संगम म्हणजे चित्रपट. चित्रपट हा जीवनाचा आरसा आहे. चित्रपट आणि जीवन यातील परस्परांचे प्रतिबिंब एकमेकांत आढळते. मनोरंजन, शिक्षण, प्रबोधन आणि समाजातील जागृती करण्याचे चित्रपट हे प्रभावी साधन आहे. त्यामुळेच चित्रपटांचा अभ्यास हा सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा ठरतो. चित्रपटासारखी जीवनाशी निगडीत कला टिकाव धरून राहिली पाहिजे, उत्तरोत्तर या कलेची प्रगती झाली पाहिजे, त्यामुळेच समाजालाही सर्वार्थाने या कलेचा उपयोग होऊ शकेल.

चित्रपट माध्यमाविषयी भाष्य करताना पन्ना शहा म्हणतात,

**''चित्रपट हे असे प्रभावी माध्यम आहे की, ज्यामध्ये सामाजिक बदल**

**लोकशिक्षण वरवर कमी महत्त्वाच्या वाटणाऱ्या परंतु अत्यंत गंभीर स्वरूपाच्या सामाजिक प्रश्नांचा वेध घेतलेला असतो.'' ...५**

चित्रपटांनी फक्त करमणूकच करावी का की समाजप्रबोधन हेही त्याचे महत्त्वाचे कर्तव्य आहे? असे अनेकविध प्रश्न आणि त्यांची अनेकविध उत्तरेही आहेत. शेवटी निर्मात्याला चित्रपट व्यवसायात स्थिर व्हायचे आहे. पैसा जनतेकडून, प्रेक्षकांकडून येणार म्हणून 'मागणी तसा पुरवठा' या गोष्टींवर निर्मात्याला लक्ष केंद्रीत करावे लागते. विशाखा गारखेडकर चित्रपटाविषयी म्हणतात-

**''अनेकविध कलामाध्यमांपैकी चित्रपट या माध्यमाने सामान्य माणसाशी चांगल्या प्रकारे संवाद साधलेला आहे. चित्रपटाने सामान्य माणसांच्या रिकाम्या वेळेवर एक प्रकारे साम्राज्य गाजविले आहे. लोकांची वेगवेगळी अभिरूची, बदलत्या सामाजिक जाणीवा, नव्या आशावादी संकल्पना, तृप्त व अतृप्त इच्छा इ. अनेक गोष्टींना चित्रपट माध्यमांनी आपल्या कलाविष्कारातून अत्यंत प्रभावी आणि परिणामकारकरित्या जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे अद्वितीय कार्य केलेले आहे.'' ...६**

यशस्वी चित्रपटाचे गणित कुणालाच सापडलेले नाही पण निर्मात्याच्या दृष्टीनेच नव्हे तर तंत्रज्ञ, कलावंत आणि एकूणच समाजाच्या दृष्टीने चित्रपट व्यवसाय यशस्वी होणे ही काळाची गरज आहे आणि म्हणूनच मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील समस्यांचा शोध क्षेत्रीय पाहणीत घेतलेला आहे.

रसिकांना चित्रपट आवडला तर तो चित्रपटगृहांवर गर्दी करणार अर्थात् चित्रपट चालणार व निर्मात्याला पैसे मिळणार पण प्रेक्षकांना कोणता चित्रपट आवडेल व कोणता आवडणार नाही याचे गणित काय? या संदर्भात समाज, कला आणि आवड यांची सांगड घालताना अशोक राजवाडे म्हणतात,

**''सामान्यत: आपली कलात्मक जाणीव अशा स्वरुपाची आहे की, कथेतील काही चांगल्या घटकांची गोळाबेरीज म्हणजे उत्तम चित्रपट. उदाहरणार्थ चांगली कथा+चांगले संवाद+चांगला अभिनय इत्यादी घटकांची गोळाबेरीज म्हणजे चांगला चित्रपट असं मानण्याची पद्धत आहे.'' ...७**

मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील समस्यांचा शोध घ्यावयाचा झाल्यास या संबंधीत

क्षेत्रांची पाहणी व अभ्यास करणे गरजेचे आहे. अन्वेषणात्मक संशोधन आराखडा यासाठी याठिकाणी वापरण्यात आलेला आहे. समस्यांचा शोध घेण्यासाठी, समस्यांची माहिती होण्यासाठी तसेच संशोधनानंतर उपाययोजना शोधण्यासाठी पुढील तीन टप्प्यांचा विचार करणेत आला.

**(अ) साहित्याचे समालोचन -** Review of Literature यासाठी चित्रपट, विशेषत: मराठी चित्रपट निर्मिती या विषयाशी संबंधीत प्रकाशित साहित्य, मासिके, साप्ताहिके, प्रकाशित ग्रंथ व विविध शोधप्रबंध यांचाही आढावा घेण्यात आला.

**(ब) सामाजिक सर्वेक्षण-** याचे वर्णन आणि सामाजिक सर्वेक्षणाचा अभ्यास पुढे ५.५ विश्लेषण यामध्ये दिला आहे.

**(क) अंतर्दृष्टीस चालना देणारे घटक-** याचा सविस्तर उल्लेख जाणकारांच्या मुलाखतीमध्ये दिलेला आहे.

## ५.५ विश्लेषण -

यामध्ये (ब) सामाजिक सर्वेक्षणाचा अभ्यास आहे. मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील समस्या शोधण्यासाठी मराठी चित्रपट निर्मिती क्षेत्राशी संबंधित निर्माते, दिग्दर्शक, छाया चित्रकार थोडक्यात तंत्रज्ञ आणि कलावंत तसेच शिक्षक, प्राध्यापक, जाणकार रसिक, पत्रकार आणि समिक्षक अशा १०० जणांचे सर्वेक्षण प्रश्नावलीच्या आधारे केले.

**प्रश्नावलीत पुढील पाच ठळक विभाग होते.**

१) चित्रपट व्यवसायाची ओळख

२) आवड व प्रशिक्षण

३) मराठी चित्रपट निर्मितीतील समस्यांबाबत

४) मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील घटक

५) उपाय व मार्गदर्शन.

(परिशिष्ट मध्ये 'प्रश्नावली' जोडलेली आहे.)

**विश्लेषण प्रक्रिया -**

प्रश्नांची उत्तरे तालिका स्वरुपात घेऊन, आलेखांच्या स्वरुपात त्यांची मांडणी केल्यानंतर त्यांचे विश्लेषण करणे सोपे जाईल. आता प्रश्नावलीच्या क्रमवारीप्रमाणे

प्रश्नावलीला उत्तर देण्याऱ्या १०० उत्तरदात्यांचा आणि त्यांच्या उत्तरांचा तौलनिक अभ्यास व त्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे.

**१. चित्रपट व्यवसायाची ओळख.**

**१.१ आपण चित्रपट व्यवसायाशी कशा प्रकारे संबंधित आहात?**

उत्तरदाते पुढीलप्रमाणे आहेत-

(अ) कलाकार - ५६ (ब) तंत्रज्ञ - ३२

(क) समीक्षक/लेखक/पत्रकार -७ (ड) एक रसीक - ५

**१.२ आपण मराठी चित्रपटांशी किती वर्षांपासून संबंधित आहात?**


(अ) ५ वर्षे - ३९ (ब) १० वर्षे - २४


(क) १५ वर्षे - २२ (ड) २० वर्षांहून अधिक - १५

**१.३ चित्रपट निर्मितीतील पुढीलपैकी कोणता पैलू तुम्हाला जास्त जवळचा वाटतो?**

(अ) संहितालेखन २४ (ब) दिग्दर्शन -३६

(क) संकलन - १२ (ड) वितरण व प्रसिद्धी - १४




यावरून असे दिसते की, जास्तीतजास्त म्हणजे ३६% जाणकारांना दिग्दर्शन हा पैलू जवळचा वाटतो, तर संहितालेखन २४% लोकांना, छायाचित्रण१४% जाणकारांना तर वितरण व प्रसिद्धी १४% लोकांना आणि संकलन १२% लोकांना जवळचे वाटते.

याचा अर्थ असा की, चित्रपटाच्या दृष्टीने दिग्दर्शन हा पैलू अतिशय महत्त्वाचा असून त्यानंतर कथा-पटकथा-संवाद म्हणजे संहीतालेखनाचा क्रम लागतो. दोन्ही मिळून चित्रपटाचा ६०% भाग व्यापतात.

### १.४ या पैलूची रुची कशामुळे निर्माण झाली?


(अ) ग्रंथ वाचून- १०　　(ब) चित्रपट पाहून - ४२


(क) सहवासामुळे - ८　　(ड) निखळ प्रेम व आवड यामुळे - ३२

(इ) अन्य एखादे कारण - ८

यावरुन असे दिसते की, चित्रपटविषयाचे जे अनेक पैलू आहेत त्यातील उत्तरदात्यांना आवडणाऱ्या पैलूची रुची ४२% लोकांना चित्रपट पाहण्यामुळे झाली. निखळ प्रेम व आवड यामुळे आकृष्ट होणारे ३२% आहेत. ग्रंथ वाचून १०% आकृष्ट होतात तर सहवासामुळे ८% उत्तरदात्यांना रुची निर्माण झाली.

उत्तरदाते





### १.५ विशिष्ट क्षेत्रातील आवड जोपासण्यासाठी आपण कोणते प्रयत्न केलेत?


(अ) साधना - २४　　(ब) गुरुपरंपरा - २२

(क) ग्रंथवाचन - १८　　(ड) चुका व शिका या तंत्राप्रमाणे - १६

(इ) स्वयंप्रयत्नातून - २०

उत्तरदाते




यावरून असे दिसते की, २४% म्हणजे जास्तीतजास्त उत्तरदात्यांनी आवड जोपासण्यासाठी साधनेचा आधार घेतला आहे. त्यानंतरचा क्रम लागतो गुरुपरंपरेचा

२२% तर स्वप्रयत्नातून २०%, ग्रंथववाचन १८% तर चुका व शिका या तंत्राप्रमाणे वागणारे सगळ्यात कमी म्हणजे १६% आहेत.

**१.६ आपल्या आवडीस आकार देण्यासाठी एखादी घटना कारणीभूत ठरली काय?**

(अ) होय - ६६%　　　　(ब) नाही - ३४%

६६% लोकांच्या बाबतीत त्यांच्या आवडीस आकार देण्यासाठी कोणती ना कोणती घटना कारणीभूत ठरली आहे. ३४% लोकांच्या बाबतीत सहजच आवड निर्माण झाली यासाठी कोणतीही घटना कारणीभूत ठरलेली नाही.

**२. आवड व प्रशिक्षण -**

**२.१ चित्रपट क्षेत्रात तंत्रज्ञ किंवा कलाकार म्हणून काम करण्यासाठी प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे, असे आपणास वाटते काय?**

(अ) होय - ६४　　　　(ब) नाही - ३६.

जास्तीतजास्त ६४% लोकांना वाटते की, प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे तर ३६% म्हणतात गरजेचे नाही. याबाबतीत प्रत्यक्ष चर्चा करताना लक्षात आले की, उपजत प्रतिभा असणारे खूप चांगले कलाकार आहेत, त्यांना प्रशिक्षण घेण्याची गरज नाही, पण दिग्दर्शक, छायाचित्रकार, संकलक आणि संगीतकार तसेच नृत्यदिग्दर्शक इ. तंत्रशाखांमध्ये काम करणाऱ्यांसाठी प्रशिक्षणाची गरज असल्याचे मत कित्येकांनी व्यक्त केले.


**२.२ तुम्ही या बाबतीत प्रशिक्षण कोठे घेतले?**


(अ) या क्षेत्रातील अनुभवी व्यक्तीकडून -३२

(ब) एफ.टी.आय. सारखी प्रशिक्षण संस्था-०

(क) स्वत:च्या आवडीने व कलाकृती पाहून - ५६

(ड) संबंधित विषयावरील साहित्याचे वाचन, मनन करुन -१२



जास्तीतजास्त म्हणजे ५६% लोकांनी स्वत:च्या आवडीने व कलाकृती पाहून प्रशिक्षण घेतले. ३२% लोकांना या क्षेत्रातील अनुभव व्यक्तिंचे मार्गदर्शन लाभले तर संबंधित विषयावरील साहित्याचे वाचन आणि मनन करुन १२% लोकांनी प्रशिक्षण घेतले. एफ.टी.आय. सारख्या प्रशिक्षण संस्थेमार्फत शिक्षण घेणारा एकही यात नाही.

**२.३ स्वयं अध्ययनानंतर किंवा प्रशिक्षणानंतर आपण उमेदवारीचे काम कोणाकडे केले आहे काय?**

(अ) होय - २४ (ब) नाही - ७६

यातील २४% लोकांनी कुणा ना कुणाकडे उमेदवारीचे काम केले आहे. अर्थात् काहींनी या क्षेत्रातील जाणकारांकडून किंवा बुजूर्गाकडून मार्गदर्शन घेतले आहे.

**२.४ स्वयंशिक्षण (चुका व शिका) किंवा प्रशिक्षण यापैकी आपण कशाला जास्त महत्त्व द्याल?**

(अ) स्वयंशिक्षण - ४४ (ब) प्रशिक्षण - ५६

५६% लोकांना प्रशिक्षण मिळण्यावर जास्ती विश्वास आणि खात्री आहे तर ४४% लोकांना स्वयंशिक्षणच महत्त्वाचे वाटते.

**२.५ चित्रपटक्षेत्रात यशस्वी होण्याच्या दृष्टीने सध्याच्या उपलब्ध प्रशिक्षण सुविधा अपुऱ्या आहेत असे आपणास वाटते काय?**

(अ) होय - ७२ (ब) नाही - २८

कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे तर सुयोग्य प्रशिक्षण महत्त्वाचे. प्रशिक्षणामुळे नवे नवे शिकायला मिळते. उपजत अंगी असणाऱ्या गुणांचा विकास होतो तर चुका कशा टाळाव्यात हेही कळते. शिवाय प्रशिक्षणामुळे आत्मविश्वास वाढतो व चांगले ते करण्याचा प्रयत्न होतो. त्यामुळेच ७२% लोकांना प्रशिक्षण सुविधा अपुऱ्या आहेत असे वाटते व त्यामुळे त्यात सुधारणा व्हावी असे वाटते, हेही उघड आहे.

## ३. चित्रपट निर्मितीतील समस्यांबाबत-

**३.१ भांडवलाचा अभाव ही चित्रपट निर्मितीतील महत्त्वाची समस्या आहे, असे आपणास वाटते काय?**

(अ) होय - ७८ (ब) नाही - २२

कुठलाही धंदा किंवा व्यवसाय म्हटला की, त्याला भांडवलाची गरज ही आहेच.

चित्रपट व्यवसायाशी तर अनेक धंदे निगडीत आहेत. शिवाय इथं पैशांशिवाय पान हालत नाही. म्हणूनच ७८% लोकांना वाटते की, मराठी चित्रपट निर्मितीतील भांडवलाची समस्या मोठी आहे. २२% लोकांना असे वाटत नाही. याचा अर्थ याच्याबरोबरीने किंवा याशिवाय इतर समस्या त्यांना मोठ्या आणि महत्त्वाच्या वाटतात.


**३.२ शासनाचे आर्थिक व इतर सहकार्य मराठी चित्रपट निर्मितीसाठी पुरेसे आहे काय?**


(अ) होय - ५८ (ब) नाही - ४२

५८% म्हणजे जास्तीतजास्त लोकांना शासनाचे सहकार्य पुरेसे आहे असे वाटते. ४२% लोकांना शासनाने आणखीन सहकार्य करावे अशी अपेक्षा आहे. मराठी चित्रपटाच्या स्थैर्यासाठी आणि उन्नतीसाठी शासनाने निरनिराळी पावले उचलली आहेत. करपरतीपासून आता अनुदानापर्यंत शासनाने सहकार्याचा हात पुढे केला आहे. चर्चेत तर काही जणांनी सांगितले की, एवढा पैसा चित्रपट निर्मितीसाठी खर्च करण्यापेक्षा-बेरोजगारांसाठी, दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी आणि गरजू शेतकऱ्यांसाठी हा पैसा खर्च करावा. यातून सामाजिक कल्याण होईल. चित्रपटाच्या माध्यमातून अप्रत्यक्षपणे सामाजिक हेतू जपण्यापेक्षा हे प्रत्यक्ष सहकार्य मोलाचे ठरेल असे त्यांना वाटते.

**३.३ शासन किंवा इतर संस्था यांच्याकडून (उदा. अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ) निर्मितीचे प्रगत तंत्रज्ञान कितपत उपलब्ध करून दिले जाते?**

(अ) पुरेसे - ३४ (ब) अल्पसे - ५८ (क) काही नाही - ८




सध्याची परिस्थिती पाहता निर्मितीचे तंत्रज्ञान देणाऱ्या संस्था विशेष नाहीत. ज्या

आहेत त्यांचा लाभ फार कमी लोकांना मिळतो. त्यामुळे ५८% लोक अल्पसे म्हणतात ते बरोबर आहे. ३४% जणांना ते पुरेसे वाटते कारण प्रगत तंत्रज्ञानाचे महत्त्व त्यांच्या लक्षात आलेले दिसत नाही.

### ३.४ हिंदी चित्रपटांच्या तुलनेत मराठी चित्रपट प्रदर्शन व वितरणात कोठे व का मागे पडतात?

(अ) राज्य सरकारच्या धोरणाचा अभाव- २६ (ब) संघटनांचा अभाव -१२


(क) दबावगटाचा अभाव -८ (ड) चित्रपटगृहांची कमतरता-५४


५४% लोकांना म्हणजे जास्तीतजास्त उत्तरदात्यांना वाटतंय की, चित्रपटगृहांची कमतरता असल्यामुळे त्याचा परीणाम मराठी चित्रपटांच्या वितरण आणि प्रदर्शनावर होतो, अर्थात् हिंदीच्या तुलनेत तर २६% लोक याला राज्यसरकारच्या धोरणाचा अभाव कारणीभूत आहे असे मानतात. या समस्येसाठी मराठी लोकांकडे संघटना नाहीत असे वाटते तर दबावगटाचा अभाव ८% लोकांना वाटतो.

### ३.५ मराठी चित्रपटांना प्रदर्शनासाठी चित्रपटगृहे का मिळत नाहीत?

(अ) प्रेक्षकांचा अल्प प्रतिसाद-४८ (ब) सवलतींचा अभाव-३२

(क) अपुरे शासकीय पाठबळ-१४ (ड) इच्छाशक्तिचा अभाव-६




प्रेक्षकांचा अल्प प्रतिसाद हे कारण जास्तीतजास्त म्हणजे ४८% लोकांना वाटते. वेगवेगळ्या आवश्यक सवलतींचा अभाव असल्यामुळे असे घडते, असे ३२% लोकांना वाटते. शासकीय पाठबळ पुरेसे नसल्याने असे घडत असावे असे १४% लोकांना वाटते तर या मागे इच्छाशक्तिचा अभाव आहे असे ६% लोकांना वाटते. अर्थात् प्रेक्षकांचा प्रतिसाद जेवढा जास्त तेवढा चित्रपटगृहवाल्यांनाही फायदा जास्त. शिवाय त्यांच्या

रिप्युटेशनचाही प्रश्न असतो. गर्दीचे मानसशास्त्र सांगते की, जिथे गर्दी जास्त ते सर्वोत्तम. या पद्धतीने चित्रपटगृहांचा प्रतिसाद प्रेक्षकांच्या प्रतिसादाच्या प्रमाणातच राहणार परंतु याला इतरही अनेक बाजू आहेत.

**४. मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील घटक-**

**४.१ मराठी चित्रपट कलाकार व्यवसायात स्थिर आहेत काय?**

(अ) होय-१८ (ब) नाही-८२

जास्तीतजास्त म्हणजे ८२% उत्तरदात्यांना वाटतं की, मराठी चित्रपट कलाकार व्यवसायात स्थिर नाहीत. १८% म्हणतात की, ते स्थिर आहेत. चर्चा केल्यानंतर आणि प्रत्यक्ष अनुभव पाहीला तर फक्त मूठभर कलाकारच आर्थिकदृष्टया या व्यवसायात स्थिर आहेत. पूर्वीपेक्षा आताच्या कलाकारांची परिस्थिती जास्त चांगली आहे असे दिसते. १८% लोक फक्त मूठभर यशस्वी कलाकारांवरुन हे अनुमान बांधतात, पण जास्तीतजास्त कलाकार आर्थिक विवंचनेत आहेत हे सत्य नाकारता येत नाही, हा चर्चेचा सूर होता.

**४.२ मराठी चित्रपट तंत्रज्ञ व्यवसायात स्थिर आहेत काय?**

(अ) होय-१८ (ब) नाही-८२

कलाकार आणि तंत्रज्ञ या दोन्ही घटकांबाबत उत्तरदात्यांचा कल सारखाच आहे. तंत्रज्ञांची परिस्थिती अशीच आहे. ज्याचं चाललंय त्याला खूप आहे, नाही त्याला काहीच नाही. कलाकार असो वा तंत्रज्ञ जो नावारुपाला आला आहे, ज्याला प्रसिद्धी आहे त्याला आज भरपूर पैसा मिळतो आहे, कारण त्यांच्या प्रसिद्धीचा उपयोग चित्रपटाच्या यशावर होत असतो. तसेच वितरकही प्रसिद्ध कलाकार, प्रसिद्ध दिग्दर्शक यांची चित्रपटातील उपस्थिती पाहूनच वितरणासाठी चित्रपट घेतात. परंतु यामुळेच सरसकट सर्व कलाकारांची किंवा तंत्रज्ञांची व्यवसायात घडी बसली आहे किंवा ते सुस्थितीत आहेत असं म्हणणं धाडसाचं ठरेल.

**४.३ चित्रपट निर्मितीतील प्रगत ज्ञान उपलब्ध करुन देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असावी काय?**

(अ) होय-८४ (ब) नाही-१६

८४% उत्तरदात्यांना वाटतं की, चित्रपट निर्मितीतील प्रगत ज्ञान उपलब्ध करुन देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असावी. प्रत्येक दिवसागणिक नवे नवे तंत्रज्ञान येत


चाललेले आहे. ही इलेक्ट्रॉनिक युगाची क्रांति आहे. 'जो शिकला तो टिकला.' नवे ज्ञान उपलब्ध असल्याने जुन्याकडे कोणी वळून पाहणार नाही. चित्रपटकला जिवंत ठेवायची असेल तर नव्या वाटा, नवी तंत्रे चोखाळणे गरजेचे आहे आणि म्हणूनच चित्रपट निर्मितीतील प्रगत ज्ञान उपलब्ध करुन देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असावी असे जास्तीतजास्त लोकांना वाटते. १६% लोकांचा कदाचित 'जुनं ते सोनं' यावर विश्वास असावा किंवा उपजत ज्ञान हेच श्रेष्ठ आहे असे वाटत असावे.


### ४.४ मराठी चित्रपटांविषयी अभिरुची निर्माण करण्यात माध्यमे किती जागरुक आहेत?

(अ) अल्प-८२ (ब) मध्यम-१०

(क) परिपूर्ण-४ (ड) अधिक-४

उत्तरदाते



मुद्रीत माध्यम असो वा इलेक्ट्रॉनिक माध्यम प्रसिद्धी आणि जनजागृतीमध्ये यांचा वाटा मोठा आहे. पण ही माध्यमे मराठी चित्रपटांविषयी अभिरुची निर्माण करण्यात किती जागरुक आहेत असा विचार केला असता ८२% उत्तरदात्यांना अल्प प्रमाण वाटते, मध्यम प्रमाणात १०% लोकांना वाटते तर परिपूर्ण ४% व अधिक ४% असते हे प्रमाण आहे. अर्थात् हा जनमतावर माध्यमांचा होणाराच परिणाम आहे हे लक्षात घेतले पाहीजे. माध्यमे एकंदरीत चित्रपटांना, त्यांच्या विविध घटकांविषयी माहीतीला भरपूर स्थान देत असतील पण प्रश्न असा आहे की, मराठी चित्रपटांच्या वाट्याला हे कव्हरेज किती येते. या प्रमाणात खूप वाढ व्हावी अशी अपेक्षा यातून दिसून येते.


### ४.५ वृत्तपत्रे/नियतकालीके मराठी चित्रपट साहित्यास पुरेशी जागा देतात काय?


(अ) होय-३४ (ब) नाही-६६

वरील प्रश्नाच्या उत्तराप्रमाणेच हेही उत्तर आहे. ६६% म्हणजे जास्तीतजास्त उत्तरदात्यांचे मत आहे की, वृत्तपत्रे/नियतकालीके मराठी चित्रपट साहित्यास पुरेशी जागा देत नाहीत. तर ३४% लोकांना असं वाटतं की, वृत्तपत्रे मराठी चित्रपट साहित्यास पुरेशी जागा देतात. या ६६% उत्तरदात्यांचे उत्तर नकारार्थी आहे. त्याची कारणे त्यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

(अ) समीक्षकांचा अभाव-३३ (ब) वातावरण निर्मितीचा अभाव-६

(क) परस्पर समन्वयाचा अभाव-५ (ड) माध्यमांचा नकारात्मक दृष्टीकोन-२२




या नकारात्मक मत नोंदविण्याऱ्या उत्तरदात्यांच्या कारणांकडे पाहिल्यास असे दिसते की, ३३ म्हणजे यातील ५०% लोक म्हणतात समीक्षकांचा अभाव तर, २२ म्हणजे ३३.३३% लोक म्हणतात माध्यमांचा नकारात्मक दृष्टीकोन. इतरांना वाटते की, वातावरण निर्मितीचा अभाव (६) किंवा परस्पर समन्वयाचा अभाव (५) जे खपतं तेच विकलं जाणार. मागणी तसा पुरवठा करणं हे व्यवसायाचं गणित आहे. याचा अर्थ मराठी वाचकच मराठी चित्रपट साहित्य वाचण्यात उदासिन आहे का? असा प्रश्न दूरान्वयाने निर्माण होतो.


**५. उपाय व मार्गदर्शन.**


**५.१ मराठी चित्रपट निर्मितीच्या दृष्टीने कोणती समस्या अधिक बिकट वाटते?**

(अ) तांत्रिक-९ (ब) आर्थिक-५९

(क) प्रदर्शन व वितरण-२६ (ड ) व्यवस्थापन-६

(इ) अन्य एखादी कोणती?-०




उत्तरदात्यांपैकी ५९% लोकांना वाटतं की, मराठी चित्रपट निर्मितीच्या दृष्टीने आर्थिक समस्या मोठी आहे. २६% लोकांन वाटतं की, प्रदर्शन आणि वितरणाची समस्या मोठी आहे. व्यवस्थापनाची समस्या ६% लोकांना वाटते. या शिवाय अन्य कोणती समस्या असावी असे २% लोकांना वाटते. पैशाशिवाय चांगली चित्रपट निर्मितीच काय, इतर कोणतीही निर्मितीसुद्धा घडणे शक्य नाही, हे खरे आहे. म्हणूनच ५९% लोकांचा कल आर्थिक समस्येच्या बाजूने आहे. माल तयार करण्यापेक्षा जास्त तो खपवणे महत्त्वाचे आहे आणि म्हणूनच प्रदर्शन आणि वितरणाची समस्या २६% लोकांन वाटते.

**५.२ मराठी चित्रपटांच्या यशापयशात पुढीलपैकी कोणता घटक आपणास कारणीभूत वाटतो?**

(अ) निर्मात्याची फायद्याशी/कलेच्या बांधीलकी-२२


(ब) दिग्दर्शन क्षमता-४


(क) कलाकारांची अभियन क्षमता-४

(ड) मराठी प्रेक्षकांची मनोवृत्ती-३४

(इ) शासन सहकार्य/उदासीनता-८

(फ) दूरदर्शनवरील विविध वाहिन्यांचा प्रभाव-२८



मराठी चित्रपटाच्या यशाचा किंवा अपयशाचा विचार केल्यानंतर सर्वसाधारणपणे वरीलपैकी ६ घटक कमीअधिक प्रमाणात कारणीभूत ठरतात असे दिसते. यश असो वा अपयश ते सांघिक असते. कोणत्या निव्वळ एका गोष्टींच्या अस्तित्त्वामुळे किंवा अभावामुळे यश किंवा अपयश ठरत नसते. यामुळे वरीलपैकी एकापेक्षा अनेक घटकांसमोर टिक मार्क करणे इष्ट ठरेल असे काहींचे मत पडले. पण प्रश्न असा पडतो की, यशाचे श्रेय किंवा अपयशाचे खापर फोडणे यासाठी जास्तीतजास्त कोणता घटक कारणीभूत ठरेल अशा एकावरच टिकमार्क करा अशी सूचना देण्यात आली.

जास्तीतजास्त लोकांना म्हणजे ३४% लोकांना वाटते की, मराठी प्रेक्षकांची मनोवृत्ती यशापयशाची मोठी वाटेकरी आहे. कारण प्रेक्षकांची उदासीनता. हिंदी चित्रपटांवरील अनाठायी प्रेम तसेच 'मी मराठी चित्रपट पाहत नाही' असे भूषण मिरविणारे हेच मराठी चित्रपटांच्या यशापयशाचे वाटेकरी आहेत हे या वर्गाचे म्हणणे आहे.

जास्तीतजास्त निर्माते फायद्याशी बांधील आहेत व काही निर्माते कलेशी बांधिलकी दाखवतात. फायदा मिळवायचा म्हणजे खर्चात काटकसर आली, याचा परिणाम निर्मितीमूल्यावर होतो. परिणामी प्रेक्षक अशा चित्रपटांकडे पाठ फिरवितात आणि नुकसान होते. म्हणूनच २२% लोकांना हा घटक मोठा वाटतो.

दूरदर्शनवरील वाहीन्यांनी मराठी चित्रपटांवरच नव्हे तर हिंदी चित्रपटांच्या प्रेक्षकवर्गातही लक्षणीय घट केलेली आहे. घरबसल्या, आपल्या सोईने, एकाच वेळी सर्व कुटुंबियांना मोफत करमणूक उपलब्ध असेल तर वेळ काढून, खर्च करुन आणि गैरसोय पत्करुन थिएटरमध्ये कोण कशाला जाईल? यामुळेच २८% इतक्या उत्तरदात्यांना वाटतं की, दूरदर्शनवरील विविध वाहिन्यांचा प्रभाव मराठी चित्रपटांच्या अपयशाला कारणीभूत आहे. शासन सहकार्य/उदासीनता ८% लोकांना वाटते तर प्रत्येकी ४% उत्तरदात्यांचा कल दिग्दर्शन क्षमता आणि कलाकारांची अभिनय क्षमता याविषयी आहे.

**५.३ अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे कार्य यासाठी पुरेसे आहे काय?**

(अ) होय-५८ (ब) नाही-४२

५८% उत्तरदात्यांना अ.भा.चि. महामंडळाचे कार्य पुरेसे आहे असे वाटते इतरांना म्हणजे ४२% उत्तरदात्यांना तसे वाटत नाही. प्रत्यक्ष चर्चेत असे आढळून आले की, अ.भा.चि. महामंडळामुळे खूप जणांच्या समस्या सुटल्या आहेत. तंत्रज्ञ, कलाकारांच्या

मानधनाबाबतच्या अडचणीत महामंडळाने चांगला पुढाकार घेतला आहे. गरजू सभासदांसाठी काही योजनाही राबविल्या आहेत. परंतु ४२% लोकांना महामंडळाकडून आणखी काही अपेक्षा आहेत असे दिसते.

**५.४ मराठी चित्रपट निर्मितीच्या समस्या सोडविण्यासाठी एखादी अशासकीय संस्था निर्माण करावी काय?**

(अ) होय-७४ (ब) नाही-२६

७४% उत्तरदात्यांना वाटते की, अशा प्रकारची अशासकीय संस्था स्थापन करणे गरजेचे आहे. २६% लोकांना तशी गरज वाटत नाही. यातील अध्याहृत गोष्ट चर्चेत लक्षात आली ती म्हणजे अशा संस्थेचे कार्य, घटना आणि जबाबदाऱ्या कोणत्या असाव्यात? अशा संस्था कशाप्रकारे मराठी चित्रपट निर्मितीच्या समस्या सोडविण्यात सहाय्यभूत होऊ शकतील? तरीही जास्तीतजास्त म्हणजे ७४% लोकांना वाटते अशी संस्था असावी.

**५.५ या समस्या पूर्तीसाठी काही उपाय सूचित करता येतील काय?**

यासाठी मोकळी जागा दिली होती. काही लोकांनी निरनिराळ्या प्रकारच्या उपाययोजना सुचविल्या. प्रत्यक्ष चर्चेतही यावर काही दिशादर्शन झाले.

यांचा समावेश पाचव्या प्रकरणात समस्यांवरील उपाय या सदरात अगत्यपूर्वक केला आहे. या प्रश्नावलीला उत्तर देतांना- ''एकाच प्रश्नाचे उत्तर अनेक पर्यायात असेल तर एकाच पर्यायावर टीकमार्क कशी करायची?''- असे मत काहींनी व्यक्त केले. एकंदरीत उत्तरदात्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

यापुढे तज्ञ, जाणकार अशा १० व्यक्तिंची प्रत्यक्ष मुलाखत घेऊन त्याचे विश्लेषण केले आहे. हा भाग **(क) अंतर्दृष्टीस चालना देणारे घटक** यामध्ये येतो.

**मुलाखतींचा अभ्यास-** मराठी चित्रपट निर्मितीपुढील समस्या, त्यांचे निराकरण व एकूणच मराठी चित्रपटांविषयी मतमतांतरे जाणून घेण्यासाठी पुढीलप्रमाणे दहा प्रश्नांच्या आधारावर या मुलाखती घेण्यात आल्या.

**या मुलाखतींसाठी आधारभूत असे दहा प्रश्न पुढीलप्रमाणे आहेत-**

१) आजच्या मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील समस्या कोणत्या आहेत असे आपणास वाटते?

२) 'आजची मराठी चित्रपटांची परिस्थिती' याविषयी आपले मत काय?

३) इतर प्रादेशिक चित्रपट निर्मिती आणि हिंदी चित्रपटनिर्मिती यांच्याशी तुलना करावयाची झाल्यास मराठी चित्रपट कोठे आहे असे आपणास वाटते?

४) मराठी चित्रपट जागतिक पातळीवर भरीव कामगिरी करू शकेल काय? उदा. ऑस्कर पारितोषिक पात्र होईल काय?

५) मराठी चित्रपटांच्या विकासासाठी शासनाकडून आपल्याला काय अपेक्षा आहेत?

६) शिक्षक / प्राध्यापक, पत्रकार आणि समिक्षक यांचा मराठी चित्रपटांच्या उन्नतीसाठी कसा उपयोग करून घेता येईल?

७) मराठी चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षकवर्गाला चित्रपटगृहाकडे खेचून आणण्यासाठी काय उपाययोजना करता येतील?

८) मराठी चित्रनगरी, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्याकडून आपल्या काय अपेक्षा आहेत?

९) निर्माते, दिग्दर्शक, तंत्रज्ञ आणि कलाकार यांनी मराठी चित्रपटांचे स्थान उंचावण्यासाठी काय करावे असे आपणास वाटते?

१०) एकंदरीत सर्व समस्यांचा सामना करून मराठीचे सुवर्णयुग पुन्हा निर्माण व्हावे यासाठी काय करता येईल?

**वरील दहा प्रश्नांच्या आधारे घेतलेल्या जाणकारांच्या मुलाखतीतून पुढील आशय प्राप्त झाला-**

**मुलाखत -१.**

**श्री. चंद्रकात जोशी** - चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, कलाकार, शिक्षक असे विविध आयाम असलेले व्यक्तिमत्व.

मानवी चित्रपट निर्मिती समोरील समस्या प्रत्येकाच्या पातळीवर भिन्न भिन्न प्रकारच्या आहेत. चित्रपट निर्मितीमागच्या उद्देश्यांवरही ते अवलंबून आहे. आवड म्हणून निर्मिती की फक्त अनुदान मिळवायचे आहे म्हणून निर्मिती की काळा पैसा पांढरा करावयाचा हा हेतू यावर समस्यांचे स्वरूप अवलंबून आहे. सारासार विचार केला तर आजमितीस अशा समस्या नाही असे म्हणता येईल. जिथे पैसा आहे, भांडवल आहे, तिथे निर्मितीचे

ज्ञान नाही तर कुठे वितरण, प्रसिद्धी याबाबतीत कमी पडतात म्हणजे या समस्या परस्परावलंबी आहेत. दात आणि चणे यांची व्यवस्थित गाठभेट होत नसल्याने सकस निर्मिती, यशस्वी निर्मिती घडत नाही.

आजची परिस्थिती निर्मिती बाबत उत्तम, प्रेक्षकांचा प्रतिसाद मात्र कमी. चित्रपट चालत नाही ही वाईट बाजू आहे.

इतर भाषिक चित्रपट व हिंदीशी तुलना करायची झाल्यास - दक्षिण व उत्तर या दोन दिशांच्या रचनेत मुलभूत फरक आहे. उत्तर आणि महाराष्ट्र यात लिपीक साम्य आहे, भाषेतील मूळ संस्कृत असल्याने महाराष्ट्रातील अनेकांना हिंदी भाषा मराठीच्या जवळची वाटते. मराठी भाषेचे निर्मितीकेंद्र मुंबई येथे हिंदीचा प्रभाव जास्त. यामुळे मराठी चित्रपटांचा संघर्ष हिंदीशी मोठा आहे. हिंदीची बाजारपेठ मोठी, त्यामानाने मराठीची फारच मर्यादीत. दक्षिणेशी तुलना करता भाषा वेगळी, लिपी वेगळी त्यामुळे दक्षिणेकडील निर्मात्यांना हिंदीशी स्पर्धा फारच कमी. विषयांच्या बाबतीत दाक्षिणात्य केव्हाही सरस वाटतात.

यापूर्वी अनेकदा मराठी चित्रपटांनी जागतिक भरारी मारली आहे. १९४६ मध्ये 'संत तुकाराम' ने मोठी आंतरराष्ट्रीय झेप घेतली. बर्लीन, व्हेनीस इ. स्पर्धेत आपले मराठी चित्रपट नावाजले गेलेत. 'श्वास' नेही ऑस्करपर्यंत धडक मारली. सध्याचा मराठीचा नूर पाहता नक्कीच जागतिक स्पर्धेतही मराठी चित्रपट वरच्या दर्जावर राहतील असे म्हणावयास वाव आहे.

सरकारने खूप केलंय आता काहीही करू नये. प्रादेशिक उत्तम निर्मितीलाच फक्त प्रोत्साहित करावे. पांगुळगाडा थांबवावा.

मराठी भाषिकाने एक ऋण समजून मराठी चित्रपट पाहावा.

समीक्षकांनी प्रथम स्वत: वेळ काढून चित्रपट पहावा. फुकट पासाची अपेक्षा न करता तिकीट काढून बघावा. घरबसल्या टीका करू नये.

चित्रपट पाहणे, अभ्यास करणे, चर्चा करणे, परस्परांना जाणीव करून रुची वाढविणे, फिल्म सोसायट्या स्थापन करुन तळागाळापर्यंत जावे. जास्तीतजास्त लोकांनी फिल्म सोसायट्यांचे सभासद व्हावे.

चित्रनगरी सुव्यस्थित परिपूर्ण असावी. अ.भा. मराठी चित्रपट महामंडळाने पूरक भूमिका बजावावी.

**मुलाखत -२.**

**संजय मोहिते -** नवा उभारता नाट्य, चित्रपट, दूरदर्शन कलाकार, महाराष्ट्र टाईम्स विनोदी कलाकार सन्मान विजेता...

मराठी चित्रपटासमोरील आजची मोठी समस्या म्हणजे मराठी प्रेक्षकांची उदासीनता ही होय. मराठी प्रेक्षक काही प्रमाणात उदासीन व बऱ्याच प्रमाणात आळशी आहे. चित्रपटगृहांत जाऊन चित्रपट पाहणे त्याच्या जीवावर येते.

आज नव्या दमाचे खूप नवनवे दिग्दर्शक मराठी चित्रपट दिग्दर्शित करत आहेत. मराठी कलाकार तर वाखाणण्यासारखे वरच्या दर्जाचे आहेत. चित्रपट निर्मितीची संख्या आणि दर्जा यात जाणवण्याइतका चांगला बदल होत चालला आहे.

हिंदीला बाजारपेठ मोठी त्यामुळे भांडवल मोठे, धाडस मोठे. दक्षिणेकडील चित्रपटांना हिंदीची स्पर्धा नाही आणि त्यांच्या प्रेक्षकांचे त्यांना पूर्ण पाठबळ आहे, त्यामुळे याही चित्रनिर्मितीत भांडवल मोठे आहे. 'सेक्स' हा सुद्धा दाक्षिणात्य चित्रपटांचा हुकमी एक्का असल्याने भाषा माहीत नसतानाही ते सर्वत्र गर्दी खेचतात.

आजची निर्मिती क्षमता पाहता निश्चितच मराठी चित्रपट जागतिक पातळीवरही याशस्वी होतील अशी आशा वाटते.

शासनाचे पाठबळ भरघोस आहे, यापुढे अपेक्षा करणे हास्यास्पद ठरेल.

मराठी माणसाने मराठीचा अभिमान बाळगावा. 'माऊथ पब्लिसिटी'चा चित्रपटाच्या यशात मोठा वाटा आहे, त्यामुळे चांगला चित्रपट स्वत: बघावा आणि इतरांनाही प्रोत्साहीत करावे. समीक्षकांनी टिका केलीच पाहिजे या भावनेतून टिका न करता विधायक दृष्टीकोनातून चांगले जनमत तयार करावे.

चित्रपट 'हॅमर' करणे महत्त्वाचे. चांगल्या निर्मात्यांनाही पहिले काही आठवडे प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळत नाही. अशावेळी चित्रपटगृहात चित्रपट चालवत, ढकलत नेणे ही सुद्धा एक मार्केटींगची पद्धत आहे अशा तऱ्हेने जास्त आठवडे गेल्यास तो चित्रपट चांगला आहे याही भावनेतून गर्दी खेचू लागतो.

चांगली निर्मितीमुल्ये, आधुनिक मार्केटिंग तंत्रज्ञानाचा वापर, प्रसिद्धी व वितरण यातील जागरुकता व प्रेक्षकांना प्रोत्साहीत करण्याची, त्यांना भावनात्मक आव्हान देणारी योजना या सर्वांचा वापर केल्यास आणि प्रेक्षकांनीही कर्तव्याला जागण्याची मनोवृत्ती जोपासल्यास मराठीचे 'सुवर्णयुग' पुन्हा अवतरेल.

**मुलाखत -३.**

**भालचंद्र कुलकर्णी -** जुने जाणते चरित्र अभिनेते, शिक्षक, लेखक, नाट्य दिग्दर्शक, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे कार्यवाह.

आपला मराठी चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहचण्यात फारच कमी पडतो. निर्मिती संख्येचा वेग वाढलाय. आता गुणात्मक दर्जाने गती घेण्याची गरज आहे.

मराठी चित्रपटांचा सुकाळ आल्यासारखी सध्या परिस्थिती दिसते आहे; पण एकीकडे धुवाँधार पाऊस तर काही ठिकाणी शिंतोडेही नाहीत अशी परिस्थिती आहे.

हिंदी चित्रपटांना जागतिक बाजारपेठ आहे त्यामुळे ते वरच्या थरावर आहेत. दाक्षिणात्यांना त्यांच्या जनतेचे पाठबळ आहे आणि हिंदीशी स्पर्धा नाही त्यामुळे त्यांची निर्मितीमूल्येही दमदार आहेत. भांडवल पेरणीही मजबूत आहे. मराठीला सगळ्या बाजूने समस्या आहेत. हिंदीशी स्पर्धा आणि प्रेक्षकांची उदासीनता या कात्रीत मराठी चित्रपट सापडला आहे.

मुळात भारतीय चित्रपटविश्वात अनेक विक्रम मराठी चित्रपटांनी व मराठी माणसांनी केले आहेत. भानू अथैय्या, रोहीणी हट्टंगडी यासारखी जागतिक कीर्ति संपादन करणारी मराठी माणसे आहेत. 'संत तुकाराम'पासून आजच्या 'श्वास' पर्यंत अनेक दर्जेदार चित्रपटांनी जागतिक पातळीवर आपले स्थान निर्माण केले आहे; त्यामुळे भविष्यात मराठीचा भगवा जागतिक बाजारपेठेत फडकेल हे नक्की.

मराठी प्रेक्षकांनी किमान एका महिन्यात एक चित्रपट तरी सहकुटुंब चित्रपटगृहात जाऊन पहावा. अगदी व्रत आहे असे समजून जाणकारांनी, समिक्षकांनी परिक्षणे, समिक्षणे लिहीतांना विधायक दृष्टीकोन बाळगावा. आपल्या लेखणीचा फटकारा निर्मात्याला आणि निर्मितीला बसू नये याची दक्षता घ्यावी.

कोल्हापुरात सुसज्ज चित्रनगरीची पुनर्स्थापना व्हावी. अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाने अनेक विधायक कामे केली आहेत. तंत्रज्ञ, कलाकार यांना सहकार्य केले आहे. नियमबद्धता निर्माण केली आहे.

निर्मात्यांनी शासनाच्या मदतीची अपेक्षा न करता स्वबळावर चित्रपटनिर्मिती करावी, उत्तमातील उत्तम ते सादर करायचा प्रयत्न करावा. प्रसिद्धीकडे लक्ष द्यावे आणि प्रेक्षकांशी सुसंवाद साधण्याचा प्रयत्न केल्यास तो सोनेरी दिवस दूर नाही.

**मुलाखत -४.**

**सुभाष भुरके** - चित्रपट दिग्दर्शक, कथा-पटकथा-संवाद लेखक, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे उपाध्यक्ष.

महत्त्वाची समस्या म्हणजे चित्रपटगृहात चित्रपट चालत नाहीत, त्यामुळे निर्माते अडचणीत येत आहेत. चित्रपटगृहांची कमतरता, न परवडणारी भाडी, निर्मिती संख्या वाढल्यामुळे चित्रपटगृह मिळविण्याची यातायात अशा अनेक समस्या आज आहेत.

दक्षिणेकडे खूप चांगले विषय चांगल्या तऱ्हेने हाताळलेले दिसून येतात. मराठीपेक्षा त्यांचा दर्जा चांगला आहे की नाही यापेक्षा दाक्षिणात्यांना चित्रपटनिर्मितीसाठी अत्यंत पोषक वातावरण आहे.

व्ही. शांतारामांपासून आतापर्यंतचा काळ पाहिला तर मराठीनेच यशाचे डंके वाजवले. मराठी चित्रपट जागतिक स्पर्धेत अनेकदा नावाजले गेलेत. आता नव्या दमाचे निर्माते-दिग्दर्शक नक्कीच जागतिक पातळीवरही भरीव कामगिरी करतील.

खरं म्हणजे, शासनाने सातत्याने मराठी चित्रपट निर्मात्यांना सहकार्य केले आहे. जास्तीतजास्त शक्य आहे ते देऊ केलं आहे. आता या सहकार्याच्या जोरावर संबंधितांनी खूप प्रगती करायला हवी. अपेक्षा बाळगणे, कमी करणे गरजेचे आहे. पूर्वी काहीही नसताना, उपाशी पोटी, अर्ध पोटी सर्वांनीच निर्मितीत हातभार लावला होता याची सर्वांनी आठवण ठेवावी.

चांगल्याचं स्वागत कुणीही करेल हे खरं आहे, पण मराठी प्रेक्षकांना हलवावं लागतं, उत्तेजीत करुन चित्रपटगृहाकडे आणावं लागतं. प्रेक्षकांनी उदासीनता सोडून आपल्या भाषेचा थोडा अभिमान बाळगून उत्कर्षाची अपेक्षा करावी.

शिक्षक, प्राध्यापक, पत्रकार, समीक्षक हे मत निर्माण करतात. छापून आलेले शद्ब खरे मानण्याची प्रवृत्ती नेहमीचीच आहे, त्यामुळे परीक्षण, समीक्षण किंवा एकूणच मराठी चित्रपटांविषयी लिहीतांना टोकाची टिकेची भूमिका घेऊ नये. प्रथम चित्रपट व्यवसाय तरून निर्माता आणि त्याचा संघ उभा राहणे महत्त्वाचे आहे हे लक्षात घ्यावे.

आज जाहीरातीचं जग आहे आणि जाहिरातबाजी खूप खर्चिकही झाली आहे; पण ती अपरिहार्य आहे. मराठी चित्रपटांसाठी 'बिनधास्त' इ. चित्रपटांप्रमाणे जाहीरात करणे गरजेचे आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाने कार्यात खूप सुसूत्रता आणली आहे. तंत्रज्ञ, कलावंतांना आधारभूत अशी ही संस्था कार्यरत आहे.

चित्रपटगृहे टक्केवारीने मिळणे गरजेचे आहे. निर्मात्यांनी फक्त स्वत:चाच फायदा न बघता एकूणच सांघिक भावना बाळगून सर्व घटकांचे हित पहावे. पैशाचा व्यवहार व्यवस्थीत करावा. निर्मितीतील सर्व घटकांत जीव ओतून निर्मिती करावी, सादरीकरण आणि प्रसिद्धी चांगली करावी तर पुन: मराठीचा सुवर्णकाळ अवतरेल.

**मुलाखत -५.**

**शशी गजवानी** - निर्माता दिग्दर्शक, कथा-पटकथा-संवाद आणि चित्रपट गीत लेखक, दूरदर्शन प्रतिनिधी.

हिंदीशी स्पर्धा, दूरदर्शनवरील विविध वाहीन्यात व्यस्त झालेला प्रेक्षकवर्ग त्यामुळे चित्रपटगृहांकडे चित्रपट पाहण्यात उदासीनता, वाढता निर्मितीखर्च अशा अनेक समस्या आज मराठी चित्रपट निर्मितीला भेडसावत आहे.

मराठी चित्रपटाची बाजारपेठ मर्यादीत आहे. अर्थातच त्या प्रमाणात भांडवल घालणे म्हणजे पुन्हा निर्मिती क्षमतेत कमतरता येणे. या सर्व गोष्टींमध्ये हिंदी व दाक्षिणात्य बाजी मारतात.

शासनाने योजना खूप चांगल्या काढलेल्या आहेत. त्याची अंमलबजावणी गतीने झाली तर जास्त उपयोगी होईल. मराठी चित्रपट निर्माते, दिग्दर्शकात उच्च प्रतीची निर्मिती करण्याच्या क्षमता आहेत, प्रयोगशीलता आहे, त्यामुळे जागतिक पातळीवर मराठी चित्रपट नक्कीच यश मिळवू शकेल.

'मी मराठी चित्रपट पहात नाही' याला काही जण भूषणावह मानतात. ही वृत्ती सोडली पाहीजे. घरबसल्या चित्रपट पाहणे आणि चित्रपटगृहात पाहणे या अनुभूतीत जमीन अस्मानाचं अंतर आहे. हा अनुभव घेण्यासाठी महिन्यातून किमान एखादा मराठी चित्रपट त्यांना आवडेल तो त्यांनी पहावा. एवढा प्रतिसादही खूप काही फरक घडवून आणेल.

चांगलं काय? आणि वाईट काय? प्रत्येकाचे वेगवेगळे दृष्टीकोन आहेत, पण पत्रकार, समीक्षक यांनी थोडं झुकतं माप मराठी चित्रपटांच्या बाजूने द्यावे ही माफक अपेक्षा आहे.

'पेरल्याशिवाय उगवत नाही.' जाहिरातीवरचा खर्च आणि प्रयत्न महत्त्वाचा, तसेच वेगवेगळी चर्चासत्रे महत्त्वाची ज्यातून माऊथ पब्लिसीटी निर्माण होऊ शकेल.

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे कार्य समाधानकारक आहे.

**मुलाखत -६.**

**प्रकाश शिंदे** - छायाचित्रकार.

दिवसागणीक नवे नवे तंत्रज्ञान येत आहे. जुन्या लोकांना अनुभव आहे पण नव्या तंत्राच्या वापराबाबत बरेचजण अनभिज्ञ आहेत. ज्यांना नवीन तंत्र कळले त्यांना पूर्वानुभव नाही. या दोन्हींचा समन्वय नाही ही खरी समस्या आहे.

आजची मराठी चित्रपटांची परिस्थिती वरवर पाहता चांगली वाटते पण ही सुबत्ता हा सुकाळ फक्त मूठभर लोकांच्या वाट्याला येतो. तळागाळापर्यंत सर्वांना या चांगल्या दिवसाची फळे मिळाली पाहिजेत तरच आजची परिस्थिती चांगली सुबत्ताजनक आहे असे म्हणता येईल.

सर्वांना चित्रपट आपणच शिकवला. हिंदीतले नावाजलेले तंत्रज्ञ आणि कलावंतही कोणत्या ना कोणत्या कारणाने मराठीशी संबंधित आहेत. हिंदी जागतिक स्वरुपावर पोहोचल्याने त्यांची खर्चाची, उत्पन्नाची सर्वच गणिते मोठी आहेत. कन्नड, मल्याळी, तमीळ, तेलगू यांना हिंदीची स्पर्धा नसल्याने त्यांच्या प्रेक्षकवर्गाला दुसरा पर्याय नाही याचा फायदा त्यांना मिळतो. त्यातूनही बरेचसे कलात्मक चित्रपट ते बनवतात. तसेच सेक्सी चित्रपट बनवून बाहेरच्या प्रांतातील प्रेक्षकवर्गही खेचतात.

सुरुवातच मराठी पासून सर्व चित्रपटांची आहे असे मी मानतो त्यामुळे आपले चित्रपट जागतिक स्पर्धेत नक्कीच वरती राहतील याची मला खात्री आहे. शासनाने मराठी चित्रपटांसाठी खूप केलं आहे. अनुदान वेळच्यावेळी मिळावं त्यात राजकारण, वशिलेबाजी नसावी एवढीच अपेक्षा आहे.

चांगल्याला चांगला म्हणावं लागतंय ही खरी अडचण आहे. समीक्षक वाईट ते सांगतात, चांगल्याची मुक्तकंठानं तारीफ का करत नाहीत? याचा सर्वांनी विचार करावा.

प्रसिद्धी माध्यमांचा जास्तीतजास्त वापर करुनच प्रेक्षकाला चित्रपटगृहांकडे खेचावे लागेल. अखिल भारतीय चित्रपट महामंडळामुळे कलाकार तंत्रज्ञांना एक पाठीराखा मिळालेला आहे. लोकांचा मेहनताना व्यवस्थित मिळावा या बाबतीत महामंडळाचे

कार्य वाखाणण्यासारखे आहे.

चांगली कथा व इतर सर्व बाजू चांगल्या याप्रकारे निर्मिती करून प्रसिद्धी व वितरण ही महत्त्वाची बाजू आहे याकडे लक्ष दिल्यास यश आपलंच आहे.

**मुलाखत -७.**

**बाबा मोहम्मद अत्तार - सिने पत्रकार.**

चित्रपट वेळेत न मिळणे ही खरी आजची मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील समस्या आहे. कित्येक चांगले चित्रपट, महत्त्वाकांक्षी चित्रपट आज प्रदर्शनाअभावी रांगेत उभे आहेत. त्यात घातलेले भांडवल अडकून आहे. त्यातून येणाऱ्या नव्या नव्या कलाकारांचे प्रदर्शन लांबणीवर पडत आहे. चांगल्या तंत्रज्ञांच्या बाबतीतही हीच परिस्थिती आहे.

मिळतंय त्याला खाऊन अजीर्ण आणि उरलेले उपाशीपोटी अशी दोन वर्गात विभागलेली अशी आजची मराठी चित्रपटांची अवस्था आहे. मूठभर लोकांना बाळसं आलं म्हणजे चित्रपट संघाची भरभराट झाली असं मानणं हा शुद्ध वेडेपणा आहे. चित्रपटनिर्मिती ही सांघिक यशाची बाब आहे. जर कष्ट करायला सर्व संघभावनेने राबत असतील तर यशाची फळे सर्वांपर्यंत पोहोचायला पाहिजेत. पण दुर्दैवाने मराठी चित्रपटाच्या बाबतीत हे घडत नाही ही खरी शोकांतिका आहे.

इतर चित्रपटसृष्टीशी तुलना करायची झाल्यास तीन टप्पे दिसतात. पहिला अगदी सुरुवातीचा नंतर मधला आणि २००० नंतरचे चित्रपट असा आताचा. याबाबतीत पहिल्या टप्प्यात मराठी चित्रपट आघाडीवर होता. मधल्या काळात हा आलेख तुलनात्मकदृष्ट्या खाली आला पण आता २००० नंतर परत आशादायक चित्र निर्माण होऊ लागले आहे. नव्या दमाचे तंत्रज्ञ आणि (कसलेले) नवे नवे मराठी कलावंत यांच्याकडून खूप कसदार आणि दमदार निर्मिती होऊ लागल्या आहेत.

इ.स. २००० नंतर घडत चाललेले बदल पाहता आणि (पूर्वसूरींच्या) अनुभवातून नक्कीच नवे भव्यदिव्य घडत जाऊन भावी काळात मराठी चित्रपट जागतिक पातळीवर यश मिळवेल असे वातावरण सध्या दिसू लागले आहे.

बुजूर्ग आणि जाणकारांशी वेळोवेळी शासन पातळीवर चर्चा घडून निरनिराळ्या उपाययोजना मराठी चित्रपटांना सहकार्य करण्यासाठी शासनाने करण्याचा प्रामाणिक

प्रयत्न केला आहे. कर परतीपासून ते आजच्या अनुदानापर्यंत अनेक प्रकारे शासन मराठी चित्रपटांच्यापाठी भक्कमपणाने उभे राहिले आहे. 'गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाहीतर मोडून खाल्ली' या म्हणीचा विकृत वापर केल्याचा अनुभव आहे. गाजराची पुंगी वाजवायचा प्रयत्न न करताच मोडून खाण्याच्या प्रवृत्तीने मराठी चित्रपटांच्या मूळावरच घाव घातला गेला याला शासन काय करणार? त्यापेक्षा पूर्वीचे निर्माते स्वत:च्या घामाच्या पैशाने चित्रपट निर्माण करायचे ते बरे म्हणायची पाळी आली आहे.

शिक्षक, प्राध्यापक, पत्रकार व समीक्षक जे समोर आहे त्याच्यावरच भाष्य करणार. कुरुप स्त्रीला फार तर बरी म्हणता येईल पण अप्सरा कसे म्हणणार? शिवाय परिक्षण आणि समीक्षणाचा एवढा मोठा प्रभाव प्रेक्षकांवर पडत नाही असे माझे मत आहे. परीक्षण वाचून चित्रपटाला जाणारे किंवा न जाणारे असं काही घडत नाही.

चांगल्याला चांगलं म्हणावं लागत नाही ते चांगलंच आहे हे समजण्याएवढा प्रेक्षक सुजाण आहे. फक्त प्रसिद्धी माध्यमांचा जास्तीतजास्त उपयोग आजच्या व्यस्त माणसासाठी जास्त गरजेचा आहे.

मराठी चित्रनगरीचा खेळखंडोबा सर्वपरिचित आहे. या भागासाठी चित्रनगरीची फार मोठी गरज होती. जाणकारांनी आणि या क्षेत्रातील लोकांनी तसेच शासनाने या बाबतीत म्हणावं तितकं प्रामाणिकपणानं लक्ष घातलं नाही. अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ त्याच्या मर्यादीत कार्यक्षेत्रात चांगलं काम करतं आहे, पण त्याच्या कक्षा रुंदावल्या पाहिजेत.

मराठी चित्रपटाचे सुवर्णयुग जरूर पुन्हा अवतरेल परंतु सगळ्यांनीच कंबर कसून प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. निर्मितीमूल्यं जपतानाच अनावश्यक खर्चाला फाटा दिला पाहिजे. चित्रपट निर्मिती चैनीसाठी नसून सामाजिक बांधणीसाठी आणि व्यवसायाच्या उन्नतीसाठी आहे याचे भान ठेवले पाहिजे. इतरांनीही निर्माता म्हणजे लुबाडायला किंवा लचके तोडायला मिळालेला प्राणी आहे असे समजू नये. ही पथ्ये पाळली तर भविष्यकाल उज्ज्वल आहे.

मुलाखत -८.

**मनोहर कुईंगडे** - प्रमुख कार्यवाह- अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, जुने जाणते नाट्य वितरक, विजय आनंद यांचे सहाय्यक दिग्दर्शक.

चित्रपट हा एक आदर्श व्यवसाय आहे या भावनेतून मराठी चित्रपट निर्माते-दिग्दर्शक त्याकडे पाहत नाहीत. अपवादात्मक काही लोक आहेत, पण सरधोपट मार्गाने निर्मिती करायची, चित्रीकरणपूर्व घटकांकडे लक्ष न पुरवता डायरेक्टर शूटींग, कथा-पटकथा-संवाद यावर विशेष मेहनत नाही अशी सरधोपट मार्गाने जाऊन चांगली चित्रपटनिर्मिती कशी होणार? पैसेवाल्याला ज्ञान नाही, ज्ञान असणाऱ्याकडे पैसा नाही तर दोन्ही असणाऱ्यांकडे सारासार विचारशक्ती नाही ही आजची परिस्थिती आहे आणि यामुळेच समस्या असण्यापेक्षा त्या निर्माण केल्या गेल्या आहेत.

हिंदीत पैसा भरपूर, प्रसिद्धी भरपूर पण मागणी तसा पुरवठा यामुळे अती कल्पनारम्य अवस्थेत हिंदी सिनेमा भरकटायला लागलाय. दक्षिणेकडचे निरनिराळे प्रयोगक्षम चित्रपट निर्माण करताहेत. मराठीला सध्या जाग यायला लागलेली आहे; पण प्रयत्न वाढण्याची आणि या प्रयत्नात सातत्य असण्याची जास्त गरज आहे.

वर सांगितलेल्या गोष्टींवर गंभीरपणे विचार केला तर मराठीचं काय कोणत्याही भाषेतील चित्रपट जागतिक पातळीवर यशस्वी होऊ शकेल.

शासन अनुदान देतंय पण त्यात कितपत अर्थ आहे. वेळच्यावेळी अनुदान मिळत नाही. वशिलेबाजी, गटबाजी आणि लाल फितीचा कारभार यातून मराठीचा श्वास घुटमळायची पाळी आली आहे. योजना चांगल्या पण अंमलबजावणी घातक स्वरूपाची, फसव्या स्वरूपाची आहे. कधीकधी आशेवर जगण्यापेक्षा स्वत:ची ताकद असेल तर निर्मितीत पाय टाकावा नाहीतर दुसऱ्याचे चित्रपट बघत बसावेत अशी ही अवस्था आहे.

कुणीही कुणाला घोड्यावर बसवून काहीही उपयोग होत नाही. शिक्षक, प्राध्यापक, पत्रकार आणि समिक्षक जेवढ्याचं तेवढं समोर आहे त्याप्रमाणे काम करणार. कधी कधी 'सब घोडे बारा टक्के' असा खाक्या असतो. या वर्गाचा जास्त उपयोग मला वाटत नाही. शिवाय समिक्षणे, परीक्षणे आपल्याला पाहीजे तशी लिहून घेता येतात हे सूज्ञ प्रेक्षकाला चांगले माहीती आहे. या क्षेत्रातील पन्नास वर्षांच्या वाटचालीत हे मी खूप अनुभवलंय. थोडी जागृती होऊ शकेल पण ती नगण्य आहे.

चांगल्या दर्जाचे चित्रपट प्रेक्षक पाहून जी माऊथ पब्लिसिटी होते, या प्रसिद्धीचा फार मोठा उपयोग आहे. शिवाय चित्रपटाला गर्दी असो वा नसो काही आठवडे तो हॅमर करणे म्हणजे ढकलत राहणे हा सुद्धा महत्त्वाचा खर्च केलाच पाहिजे याची जाण पाहिजे. जास्त आठवडे थिएटरला चित्रपट असेल तर तीच त्याची महत्त्वाची प्रसिद्धी आम जनतेला वाटते. यानंतर बाकीच्या मार्गांचा वापर प्रसिद्धीसाठी करणे महत्त्वाचे.

मराठी चित्रनगरी असून नसल्यासारखी आहे. काही दिवसात तिचे खाजगीकरण झाल्याचे दिसेल त्यामुळे त्याबाबतीत काय बोलणार? अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाला मात्र खूप करता येण्यासारखे आहे. त्यांनी सभासदांशी सतत संपर्क वाढविला पाहीजे. सभासदात जागृती आणि चैतन्य निर्माण केलं पाहिजे. निर्मात्यांच्या बुडवेगिरीवर चाप लावला पाहिजे. तसेच दुय्यम कलाकार, दुय्यम तंत्रज्ञ यांचं शोषण होत नाही ना? याकडे बारकाईनं लक्ष दिलं पाहिजे.

मराठीचे सुवर्णयुग निर्माण करायचे झाल्यास खूप बारकाईने विचार करून सर्वांना वागावे लागेल. मुळात कथा, पटकथा, संवाद, गीते यावर फार विचार केला पाहिजे. युद्धाची रणनीती ठरवतात त्याप्रमाणे चित्रिकरणाची रणनीती ठरविणे गरजेचे आहे. चांगले पेपरवर्क असेल तर कमीतकमी दिवसांत चित्रीकरण पूर्ण होऊन खर्चही खूप वाचेल. चित्रपट निर्मितीत एकसंघपणा येऊन त्याचा सादरीकरणावरही चांगला परिणाम दिसून येईल. आपले कष्ट, आपला घाम आणि आपली जिद्द ही अनुदानापेक्षा श्रेष्ठ आहे ही भावना बाळगल्यास फालतू खर्च टळेल, वेडावाकडा वेळ वाचेल व सर्वांचे श्रम कारणी लागतील. या सगळ्यांचा बारकाईने अभ्यासच तो चांगला काळ किंवा सुकाळ निर्माण करेल, अन्यथा नाही.

**मुलाखत -९.**

**नथानियल शेलार उर्फ ज्युनियर धुमाळ** - कलाकार, व्यवस्थापन इ. क्षेत्रात ५०-५५ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव.

पूर्वी निर्मिती करणारे घटक चित्रपट ही एक सामाजिक बांधणुकीची कला आहे, एक आनंददायक कृती आहे असे समजत होते पण आता प्रत्येकजण स्वत:पुरतं बघणारा झालाय. दुसऱ्याची काळजी कोणच करत नाही. निर्माता फक्त आपला फायदा बघतो. 'गरज सरो आणि वैद्य मरो' अशी या व्यवसायाची अवस्था आहे. काम संपले की निर्माते

विचारत नाही. काम मिळेपर्यंत कलाकार जवळीक दाखवतात. काम झाले की, वाटेला लागतात अशी अवस्था आजच्या मराठी चित्रपट निर्मितीची आहे.

आज खूप चित्रपटांची निर्मिती होतांना दिसते पण हौसे, नवसे आणि गवसेच फार आहेत. जाणकार आणि कलाप्रेमी अत्यंत कमी आहेत.

हिंदी चित्रपटांशी स्पर्धा अवघड आहे. कन्नड, तमिळ, तेलगू निर्माते सेक्सी चित्रपट निर्माण करतात यात फक्त चित्रांचाच संबंध, भाषेची गरज नसते, त्यामुळे परप्रांतियांनाही भरपूर उत्पन्न मिळते. सगळीकडे आपले गल्लाभरू चित्रपट चालतात. त्यामानाने मराठी निर्माते सामाजिक भान ठेऊन चित्रपट काढतात.

'जो जीता वही सिकंदर' त्याप्रमाणे जागतिक स्पर्धेसाठी कोणीही विजेता होऊ शकतो. भाषा महत्वाची नाही. निर्मितीचा दर्जा महत्त्वाचा आहे. मराठीतही आता चांगले चित्रपट निर्माण व्हायला लागलेत. या गतीने गेल्यास मराठी चित्रपटही जगात श्रेष्ठ ठरु शकतील.

शासनाने अनुदान योजना चालविली आहे, पण मराठी चित्रपटांचा थिएटरचा प्रश्न शासनाने सोडवला पाहिजे. आर्थिक व्यवहारावर शासनाचे नियंत्रण पाहिजे. अनुदान वेळेत मिळाले पाहिजे.

चित्रपटाच्या परीक्षणावर फारसं काही अवलंबून नाही. कित्येकजण परिक्षण वाचतही नाहीत, त्यामुळे परीक्षणाच्या मुद्दयाला फारसे महत्त्व नाही.

सर्व थरांवर प्रसिद्धी, रस्त्यावर, वाहनांवर, स्लाईड शो, पेपर, पूर्वीसारखी गाडीवर माईक लावून जाहीरात आणि बक्षिसांची योजना, लॉटरी सिस्टीम अशा वेगवेगळ्या पातळ्यांवर जाहीरात केल्यास प्रेक्षक थिएटरकडे वळतील. अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचा सर्वांनाच उपयोग आहे. त्याची ताकद वाढविली पाहिजे.

निर्मात्यांनी ज्याची त्याची देणी व्यवस्थित भागवावीत, कलाकार आणि सर्वांनी मन लावून काम करावे, जाहीराती चांगल्या असाव्यात आणि प्रेक्षकांनी आपल्या मराठी भाषेवरचे प्रेम थिएटरमध्ये चित्रपट बघून व्यक्त करावे असे झाल्यास निर्माते तरतील, तंत्रज्ञ, कलाकार आणि चित्रपट कला जगेल. मराठी चित्रपटाला पुन्हा चांगले दिवस येतील.

**मुलाखत -१०.**

**डॉ. वि. ल. धारुरकर** - व्यासंगी प्राध्यापक, पत्रकार, लेखक, प्रभावी वक्ते...

आज मराठी चित्रपटसृष्टीत समन्वयाचा अभाव विशेषत्वाने जाणवतो. निर्मिती करणारा कुणीही, कुठलाही, पैसेवाला किंवा पैसे उभा करणारा दिसतो. पूर्वी चित्रपट निर्मिती मूल्याधारीत होती. पूर्वी चित्रपट कलेकर लोकांचे प्रेम आणि श्रद्धा होती; पण आज चित्रपट हा धंदा झाला आहे आणि मराठी चित्रपटनिर्मिती त्याला अपवाद नाही.

संख्यात्मकदृष्ट्या मराठी चित्रपट वाढला पण गुणात्मकदृष्ट्या सन्माननीय अपवाद वगळता समाधानकारक परिस्थिती नाही.

मराठी चित्रपट निर्मितीत तांत्रिक सुधारणा होणे आवश्यक आहे. महेश कोठारे जसे तांत्रिक सफाईदारपणा आणण्याचा प्रयत्न करतो तसे करणारे २००० नंतर काही निर्माते-दिग्दर्शक दिसतात, पण या संख्येत वाढ झाली पाहिजे. गुणात्मक दर्जा सुधारला पाहिजे. मराठी चित्रपटातून इतर पैलुंपेक्षा किंवा हिंदीची भ्रष्ट नक्कल करण्यापेक्षा इतर सामाजिक पैलू उठावदारपणे मांडणे गरजेचे आहे.

आज खऱ्या अर्थाने हिंदीला स्पर्धा नाही पण हिंदी चित्रपट भरकटत निघाल्यासारखा निघालेला आहे. तो स्वैर आणि स्वच्छंदी होत चाललेला आहे. दाक्षिणात्य मात्र विषयांचं वैविध्य दाखवितात. त्यांची निर्मितीमूल्ये वरच्या दर्जाची आहेत. त्यांचा प्रेक्षकवर्ग त्यांच्या भाषिक चित्रपटांशी प्रामाणिक आहे. विकासाची ओढ आणि आवड आहे. मराठी प्रेक्षकही उदासीन बनत चालला आहे. मधल्या काळातील विचारशून्य निर्मितीमुळे त्याला मरगळ आली आहे, पण आता आशादायक चित्र निर्माण व्हायला लागले आहे.

सुमित्रा भावे, सुकथनकर, चंद्रकांत कुलकर्णी, गजेंद्र अहिरे, महेश मांजरेकर अशी खूप नावे घ्यावी लागतील की ज्यांच्यात जागतिक पातळीवर धडक देण्याची क्षमता आहे, उत्साह आहे, उर्मी आहे. इ.स. २००० नंतर मराठी सिनेमा वेगळ्या वळणाने चालला आहे. त्यातील प्रयोग क्षमता वाढत चालली आहे. तांत्रिक बाबीत सफाईदारपणा जाणवत चालला आहे. याचा अर्थ जगाशी स्पर्धा करण्यास आपण समर्थ आहोत फक्त किलींग इन्स्टिंक्ट- जिंकण्याची दुर्दम्य ईच्छाशक्ती हवी आहे.

पूर्वी अर्धपोटी राहून, घरंदारं गहाण टाकून चित्रपटनिर्मिती करीत. नट्या स्वयंपाक करीत, कलावंत स्पॉटवरील सामान उचलीत, एक दिलाने, जिद्दीने, कमीतकमी खर्चात,

चांगली निर्मिती होऊ शकत असे; पण आज मात्र शासनाच्या मदतीच्या कुबड्या घेऊनही दर्जेदार निर्मिती का होत नाही? या बाबतीत सर्वांनीच आत्मपरिक्षण करणे गरजेचे आहे. शासनाने जास्तीतजास्त केले आहे. अपेक्षांना अंत नाही, मर्यादा नाही, शासनाकडून अपेक्षा करणे आता आपण थांबवले पाहिजे.

शिक्षक/प्राध्यापक-पत्रकार, समीक्षक इ. पूर्वग्रहदूषिततेने लिहीतात असं म्हणता येणार नाही. 'आडातच नाही तर पोहऱ्यात कोठून येणार?' विनाकारण तारीफ काही मर्यादेपर्यंत करणार. पत्रकार, समिक्षक फक्त प्रेक्षकांना प्रेरणा, प्रोत्साहन देऊन मराठी चित्रपट पाहण्याविषयी आवाहन करु शकतात. पोवाडे ऐकून वीरश्रीचा संचार होऊ शकेल पण चांगलं परीक्षण वाचून प्रेक्षक चित्रपटगृहाकडे धाव घेतील एवढा चांगला अनुभव आजतागायत नाही. पत्रकार प्रेक्षकांना दृष्टी देऊ शकतात; पण चित्रपटगृहांकडे वळवू शकत नाहीत.

मराठी चित्रपट व्यावसायिकांनी आधुनिक मार्केटिंग तंत्राचा पुरेपुर वापर करुन घ्यायला हवा. 'बिनधास्त'ने हिंदीच्या तोडीस तोड प्रसिद्धी केली त्याचा त्यांना नक्कीच फायदा मिळाला. 'बिनधास्त'ने प्रसिद्धी तंत्राचा नवीन मापदंड तयार केला. त्याचा अवलंब केला पाहिजे.

मराठी चित्रनगरी कोल्हापूरात अद्ययावत होणे ही काळाची गरज होती आणि आहे; परंतु सुखसोयींचा वापरही करुन घेणे ही एक कला आहे ती आपल्याला जमली नाही. नाहीतर चित्रनगरी परिपूर्ण असणे हे मराठी चित्रपटविश्वाला वरदान आहे. अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे हक्क मर्यादीत आहेत. ती मर्यादा वाढविली पाहिजे कायदेशीरदृष्ट्या तिचे निर्णय सर्वांवर बंधनकारक झाले पाहिजेत. सर्वार्थाने महामंडळाची ताकद वाढविणे सर्वांच्याच हिताचे ठरेल.

चित्रपट हा एक व्यवसाय आहे. त्याची व्यावसायिकता जपायला हवी. व्यवसाय व्यवस्थापन, विपणन, विपणन व्यवस्थापन, ग्राहकांचे मानसशास्त्र इ. गोष्टींचा अभ्यास मराठी चित्रपटांशी संबंधीत सर्वच घटकांनी करायला हवा. वेळेचं नियोजन, पैशांचं नियोजन अचूक वेळेत चित्रपट प्रदर्शन ही यशाची सूत्रे आहेत. अभ्यासूपणा, अचूक निर्णयशक्ती आणि कलेवरील निस्सीम प्रेम हे अतिशय महत्त्वाचे व परीणामकारक घटक आहेत. कथा हा चिपटाचा आत्मा आहे. चाऊन चाऊन चोथा झालेले विषय बाजूला

करुन नाविन्याची कास धरली पाहिजे. चित्रपट हे दृक्‌श्राव्य माध्यम आहे याची जाणीव ठेऊन पटकथेतल्या प्रत्येत सेकंदाचं सोनं करायला हवं. चित्रपट ऐकण्यापेक्षा दिसण्यातून जास्त कळला पाहीजे यासाठी कथा-पटकथा-संवाद-संगीत या अंगावर सतत चर्चा करून वेळोवेळी त्यात बदल करत उत्तमोत्तम सादर करण्याचा प्रयत्न हवा. सादरीकरणात नाविन्य हवे, नव्या तंत्राचा योग्य वापर हवा. जगात काय चाललंय याचं भान ठेऊन जुन्याची आणि नव्याची बेमालूम सांगड घालता आली पाहीजे. प्रेक्षकांची आवड-निवड महत्त्वाची आहे तशी कलात्मक जाणीव प्रेक्षकांत वाढवणे हेही पहायला हवे. जाहीरात तंत्र, प्रदर्शन वितरण यातील अचूकता अभ्यासणे आणि प्रेक्षकांना आकर्षित करण्याऱ्या जास्तीतजास्त तंत्रांचा वापर केला तर मराठी चित्रपट नजीकच्या काळात दैदिप्यमान कामगिरी करेल हे नि:संशय सत्य आहे.

## ५.६ उपाय

मानवी जीवनात पदोपदी समस्या दिसून येतात. चित्रपट हा मानवी जीवनाचा आरसा आहे. अर्थातच जीवनात जसे अनेक समस्यांचा सामना करत करत मार्गक्रमण करावे लागते, तसेच चित्रपटांनाही छोट्या-मोठ्या अनेक समस्यांचा सामना करत करत पुढे वाटचाल करावी लागते. तसेच चित्रपट निर्मिती हा एक प्रचंड मोठा व्यवसाय आहे. गुंतागुंतीचे अनेक धंदे या एका चित्रपट व्यवसायाशी निगडीत आहेत. धंदा किंवा व्यवसाय म्हटला की, समस्या ह्या आल्याच. चित्रपट व्यवसायही याला अपवाद नाही.

अनेक समस्यांचा सामना करत करतच आजचा मानव या प्रगत अवस्थेला येऊन पोहोचला आहे. 'गरज ही शोधाची जननी आहे' गरज निर्माण झाली की, ती गरज भागविण्यासाठी माणूस हालचाल करु लागतो आणि मग नवी दिशा, नवे मार्ग दिसू लागतात. प्रत्येक पावलागणिक पुढच्या पावलांची वाट दिसू लागते आणि आपण प्रगतीच्या दिशेने पुढे पुढे सरकत जातो. नवा शोध किंवा नवी दिशा नव्याच समस्या घेऊन येतात आणि मग हा खेळ समस्या-शोध-समस्या असा अखंड चालू राहतो.

कधी कधी समस्यांचे मुलभूत स्वरूप बदलत जाते. नव्या स्वरूपात पहिल्याच समस्या समोर उभ्या राहतात. एकूणच चित्रपटसृष्टीचा इतिहास पाहता व आताच्या घटकेपर्यंतचा चित्रपट पाहता अनेक प्रकारच्या समस्या व त्यावर वेळोवेळी केलेली उपाययोजना आढळून येते.

**(१) स्त्री भूमिकांची समस्या -** अगदी सुरूवातीचा काळ हा नाटकाचा होता. त्या जमान्यात कुलीन, घरंदाज स्त्रिया मुळात उंबरठ्या बाहेरच पडत नव्हत्या. मग रंगमंचावर काम करणे दूरच, त्यामुळे पुरुषच स्त्रीवेष धारण करून रंगमंचावर स्त्रीभूमिका करीत. यातूनच बालगंधर्व प्रसिद्धीस आले.

मूकपटाचा जमाना सुरु झाला आणि इथे स्त्री भूमिकेची मोठी समस्या परत समोर उभी राहिली. नाचगाणे करणाऱ्या स्त्रिया तसेच वेश्यांना सुद्धा विनंती करण्यात आली, पण मूकपटात काम करायला कोणीही तयार होत नव्हते. चांगल्या मानधनाची, सुखसोईंची लालूच दाखवूनही अनुकुल प्रतिसाद मिळाला नाही.

बाबूराव पेंटरांनी सिनेमात स्त्रियांनाच काम देण्याचे ठरविले होते आणि त्याची ट्रायल त्यांनी महाराष्ट्रात सिनेमा चालू असतानाच घेतली होती असे महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या पहिल्या दोन प्रमुख नटींपैकी अनुसयाबाई यांच्या आठवणी वरुन वाटते. त्या म्हणतात,

**''गुडनाईट नावाचे शॉर्ट रील (दहा फूट लांबीचे) घेतले होते आणि सिनेमा संपला की ते दाखवित असत. त्यात गजराबाई नावाच्या स्त्रीने प्रथम भूमिका केली होती. भारतात प्रथम पडद्यावर आलेली हीच पहिली स्त्री, त्यानंतर मी व गुलाबबाई. सिनेमातील सुशिक्षीत पहिली स्त्री म्हणजे मीच.'' ...८**

१९१३ साली दादासाहेब तोरणे यांनी 'राजा हरिश्चंद्र' चित्रपट तयार केला. यातील तारामती ही भूमिका हॉटेलमधील वेटर आण्णा साळुंखे यांनी केली; पण नंतर मात्र दुर्गा खोटेंसारख्या घरंदाज स्त्रीने या क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर ही समस्या सुटली. आज चित्रपटात काम करणे, दूरदर्शन मालिकेत काम करणे यासाठी असंख्य तरुणी आपणहून पुढे येत आहेत. इतकेच नव्हे या क्षेत्रात येऊन करीअर करण्याचे अनेक तरुणींचे आज स्वप्न आहे. त्यांच्या पालकांचाही याला पाठिंबा आहे. कारण आपल्या मुलामुलींनी सिनेमा क्षेत्रात करियर करावे, नावलौकिक व पैसा मिळवावा असे आजच्या पालकांचेही स्वप्न आहे.

**(२) भांडवल समस्या -** ''सर्वेऽपि गुणा: कांचनम् आश्रित:'' सगळे गुण पैशाला चिकटले आहेत. तसेच पैशांशिवाय पानही हालत नाही हा अनुभव आहे. चित्रपटासाठी भांडवल उभारणी करण्याची समस्या अगदी चित्रपटकलेच्या शोधापासूनची मुलभूत अशी समस्या आहे.

चित्रपटासाठी भांडवल मिळावे म्हणून जिवाचे रान केल्याची असंख्य उदाहरणे चित्रपटाच्या पानापानातून दृष्टोत्पत्तीस येतात. दादासाहेब फाळकेंना 'राजा हरिश्चंद्र' साठी मुंबईच्या यशवंत नाडकर्णींनी भांडवल दिलं.

त्याकाळी खुद्द चित्रपटसंस्थेचे मालक हलाखीत दिवस कंठीत असत. उदाहरणादाखल सांगायचे झाल्यास १९१७ ते १९२० दरम्यानच्या महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या आर्थिक विवंचनेचे वर्णन करताना अनुसयाबाई म्हणतात,

**''धंदा नवीन. कंपनी नुकतीच चालू झालेली, पैसे नाहीत तर पगार कुठला? अशा वेळी कंपनीतून फक्त जेवण मिळे. बाबूराव पेंटर, बाबा गजबर, फत्तेलाल मामा यांची फाटकी धोतरे नेसून आम्ही दिवस कंठीत होतो.'' ...९**

दादा कोंडके यांनी 'विच्छा माझी पुरी करा'च्या प्रयोगातून पैसे मिळविले. हरतऱ्हेने हातउसने पैसे गोळा करुन 'सोंगाड्या' चित्रपटाची निर्मिती केली.

अगदी अलीकडचेच उदाहरण पहायचे झाल्यास '१० वी फ' या चित्रपट निर्मितीकडे बोट दाखविता येईल.

'१० वी फ' चित्रपटाला बालचित्र समितीनं अर्थसहाय्य नाकारलं. बालचित्र समितीने हा चित्रपट मोठ्यांचा आहे, लहान मुलांचा नाही असे सांगून अर्थसहाय्य देण्यास नकार दिला. या संदर्भात सुमित्रा भावे यांनी अभिनय कार्यशाळेतल्या मुलांच्या पालकांची मिटींग घेऊन त्यांना प्रोजेक्ट बंद करत असल्याचे सांगितले. तेव्हा पालकांनी त्यांना सांगितले की, 'प्रोजेक्ट बंद करु नका आम्ही तुम्हाला सहकार्य करु.' सुमित्रा भावे म्हणतात,

**''मग आम्हाला हुरूप आला. माझ्या मित्रमंडळी आणि नातलगांनी त्यावेळी मला आर्थिक सहाय्य करून खूप मोठे प्रोत्साहन दिले. पाहता पाहता सर्व आवश्यक निधी जमला आणि सर्व कलाकार आणि तंत्रज्ञ यांच्या अनमोल सहकार्याने हा चित्रपट साकार झाला.'' ...१०**

शासनाचे अनुदान मिळते दुसरा चित्रपट करताना, इलेक्ट्रॉनिक मिडियाचे हक्क विकून पैसे मिळतात चित्रपट पूर्ण झाल्यावर, त्यामुळे साहजिकच भांडवलाचा प्रश्न उभा राहतो नवा चित्रपट निर्माण करताना.

स्वत:च्या हिंमतीवर पैसा उभा करणे, बँका, मित्रमंडळी किंवा चित्रपटांशी

संबंधितांकडून अर्थसहाय्य मिळविणे असे मार्ग आहेत. अंडर प्रॉडक्शन पैसा उभा करणे हे ज्याच्या त्याच्या हितसंबंधावर, गुडविलवर अवलंबून आहे. निर्मितीची तळमळ असली आणि तुमचा प्रामाणिकपणा सिद्ध होत असेल तर आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी सहकार्याचे हात पुढे येतात हेही इतिहासातून दिसून येते.

**(३) कलाकार तंत्रज्ञांच्या तारखा मिळण्याच्या समस्या** - सध्याच्या काळात चित्रपटांची संख्या वाढत चालली आहे. कलाकार आणि तंत्रज्ञ सुद्धा एकापेक्षा अनेक चित्रपटांशी करार करतात त्यामुळे चित्रपटांसाठी तारखा मिळविणे ही निर्मात्याच्या दृष्टीने मोठी कटकट झाली आहे. पूर्वीच्या काळी मासिक पगारावर कलाकार, तंत्रज्ञांना कराराने बांधून घेतले जाई आणि कराराच्या काळात दुसरीकडे काम करता येणार नाही असे बंधन असे. आज तसे न राहिल्याने समस्या उत्पन्न झाल्या आहेत; परंतु दूरदर्शन मालिकांमध्ये पूर्वीची जुनी कराराची पद्धत पुन्हा पुनर्जिवीत झाल्याचे दिसून येते.

तारखांचा गोंधळ होऊ नये यासाठी सगळ्यांनी समन्वयाने चित्रपट करणे गरजेचे आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे चित्रीकरण आणि चित्रिकरण पश्चात् प्रक्रिया यांचे वेळापत्रक काटेकोरपणे ठरविता आले पाहिजे. हे ठरवितांना पर्यायी बाबतीतला विचारही होतांना पूर्वीचे कोणते करार आहेत याची माहीती दिली घेतली पाहिजे. याबाबतीत स्वार्थीपणापेक्षा सहकार्याच्या भावनेची आत्यांतिक गरज आहे.

**(४) नवे तंत्रज्ञान आणि समस्या** - या समस्या दोन प्रकारच्या आढळून येतात. पहिल्या प्रकारात नव्या तंत्रज्ञानाचे ज्ञान आत्मसात करण्याबाबतचे व दुसऱ्या प्रकारात नव्या तंत्रज्ञानाची सामुग्री उपलब्ध होण्याचे व आर्थिकदृष्ट्या ते परवडणे हेही महत्त्वाचे आहे.

जसजसा काळ पुढे जाईल तसतसे पूर्वीचे तंत्रज्ञान जुने होते. आज इलेक्ट्रॉनिक युगात तर तंत्रज्ञानाच्या प्रगतीची गती कल्पनेच्या पलीकडे आहे त्यामुळे आजचे तंत्रज्ञान उद्या जुनेपुराणे होऊन जाते. माध्यमाचे तंत्रज्ञान हे समाजावर परिणाम करणारे ठरत असते. या बाबतीत मार्शल मॅक्लुहान याने युगप्रवर्तक विचार मोडले आहेत. त्याच्या विचारांचे स्पष्टीकरण देताना डॉ. सुधाकर पवार सांगतात,

**''तंत्रशास्त्रांतर्गत हेतूमुलकतेमुळे माध्यमांचे स्वरूप म्हणजे माणसाच्या शक्तीचे विस्तारीकरणच होय असे त्यास वाटते. मानवी शक्ती मग त्या शारीरिक**

**किंवा मानसिक असोत त्यांच्यात या तंत्रज्ञानामुळे वाढ झाल्याचे दिसते. चाकाच्या शोधामुळे माणसाच्या पायाच्या शक्तिचे विस्तारीकरण झाले. ग्रंथनिर्मितीमुळे दृक्‌शक्तिचा विस्तार झाला. विद्युत् जनित्रामुळे माणसाची मध्यवर्ती मज्जासंस्थाच विकसीत झाली. चाकाच्या शोधामुळे माणसाची गती वाढली.'' ...११**

यादृष्टीने विचार केल्यास प्रत्येकास सतत विद्यार्थी भावना जागती ठेऊन नवनवीन तंत्रज्ञान शिकण्याची तयारी ठेवलीच पाहिजे. जे असे करणार नाही त्यांच्या उपयुक्ततेला आणि यशाला मर्यादा या पडणारच. माध्यमांद्वारे, विविध प्रशिक्षण संस्थाद्वारे व इंटरनेट इ. आधुनिक सुविधांद्वारे असे ज्ञान निर्मातासंघ, शासकीय, अशासकीय संघटना, फिल्म सोसायट्या यांच्या मार्फत संबंधितांना आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण देता येईल.

नव्या तंत्रज्ञानाची यंत्रसामुग्रीही दिवसेंदिवस महाग होत चालली आहे. शासकीय पातळीवर माफक दरात या गोष्टी शासनाने उपलब्ध करुन दिल्यास तसेच विविध सामाजिक ट्रस्टने अशा गोष्टी उपलब्ध करून दिल्यास या समस्येवर मात करता येईल.

**(५) चित्रपटगृहाबाबतच्या समस्या -** पूर्वी आर्थिक समस्यांमुळे चित्रपटनिर्मिती ठराविक, मर्यादीत प्रमाणात होत होती. तरीही चित्रपटगृह हिंदीच्या स्पर्धेमुळे मिळणे अवघड जात होते. यानंतर शासनाच्या विविध प्रयत्नांतून करपरतीपासून अनुदानापर्यंत निर्मात्यांना सहकार्य मिळायला लागले. याचा परिणाम म्हणून निर्माते उत्साहाने निर्मितीत उतरले. परप्रांतीय इतकेच काय परदेशी लोकी मराठी चित्रपट निर्मितीकडे वळले. साहजिकच निर्मितीसंख्या वाढली. उपलब्ध चित्रपटगृहांची आणखीनच चणचण भासू लागली.

त्यातूनही मराठी चित्रपटासाठी उपलब्ध होणारी चित्रपटगृहे कशी आहेत याविषयी सांगताना निर्माती आणि कलाकार स्मिता तळवलकर म्हणतात,

**''त्यातच मराठी चित्रपटांसाठी म्हणून जी थिएटर्स आहेत ती अतिशय घाणेरडी आहेत. तेथे कोणत्याच सुविधा नाहीत.'' ...१२**

चित्रपटगृहांच्या उपलब्धतेची समस्या आणखीनच बिकट होण्याची कारणमिमांसास करताना निर्माते विनय नेवाळकर म्हणतात,

**''एक काळ असा होता की, चित्रपटगृहांचे मालक निर्माते वितरकांना वेठीस धरत होते. आज चित्रगृह चालवणे १९६०-७० च्या दशकाप्रमाणे किफायतशीर**

**राहीलेले नाही; त्यामुळे गेल्या दहा वर्षांत अनेक चित्रगृहे बंद होत आहेत.''...१३**

वरील कारणांमुळे चित्रगृहांच्या जागांचे रुपांतर कमर्शियल कॉम्प्लेक्समध्ये होऊ लागलेले आहे.

हिंदी चित्रपटांसाठी चित्रपटगृहे देण्यात मालक तत्पर आहेत पण मराठीसाठी नाखूष आहेत याचे रहस्य सांगताना निर्माते सतीश कुलकर्णी म्हणतात,

**''थिएटरवाल्यांना प्रत्येक तिकीटामागे एक रुपया सर्व्हिस चार्ज आकारण्याची परवानगी दिली, त्यामुळे थिएटरवाले मराठी चित्रपट लावण्यास उत्सुक नसतात, कारण मराठी चित्रपटाला जर १०० प्रेक्षक येत असतील तर हिंदीला १००० येतात याचा फायदा देखील हिंदी वाल्यांनाच होतो.'' ...१४**

दक्षिणेकडे त्यांच्या भाषिक चित्रपटांसाठी काही आठवडे चित्रपटगृह देणे बंधनकारक केले आहे. याच धर्तीवर आपल्याकडेही व्हावे या मागणीने जोर धरला; त्यामुळे आज मल्टीप्लेक्समध्ये मराठी चित्रपट एकावेळी चार-चार झळकू लागलेले आहेत.

या चित्रपटगृहांच्या समस्येवर अनेकवेळा चर्चा आणि वाद रंगलेले आहेत.

यावर अनेक तऱ्हेने विचार करता येतो. एक म्हणजे उपलब्ध चित्रपटगृहे टिकवून ठेवणे, नव्या चित्रपटगृह बांधकामांना प्रोत्साहन देणे, वेगवेगळ्या प्रकारच्या करसवलती देणे असे मार्ग निघू शकतात.

छोटी छोटी चित्रपटगृहे/नाट्यगृहे निर्माण करणे, उपलब्ध हॉलस्‌चा वापर करुन त्यामध्ये चित्रपट दाखवण्याच्या सोयी करणे इ. उपाय सुचवता येतील.

चित्रपटगृहे टक्केवारीने मिळावीत अशा प्रकारच्या मागण्याही काही निर्मात्यांच्या आहेत. या संदर्भात एखादी जाणकारांची समिती नेमून यावर साधक बाधक विचार करुन उपाययोजना ठरविता येईल.

**(६) कच्च्या मालाची** (Raw Stock) **समस्या -** चित्रीकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कच्ची फिल्म. (Raw Stock) याचा पुरवठा नियमीतपणे होणे जसे गरजेचे तसेच त्याच्या किंमती परवडण्यासारख्या असणे हीही महत्त्वाची गरज आहे.

मूकपटाच्या जमान्यात फिल्म मिळणे अवघड नव्हते त्यामुळे चित्रनिर्माते एकाच वेळी मराठी आणि हिंदी चित्रनिर्मिती त्याच कथानकावर आणि त्याच कलाकार संघाकडून करुन घत. याला डबल व्हर्जन असे नाव पडले होते. दुसऱ्या महायुद्धापर्यंत या सर्व गोष्टी

शक्य होत होत्या. त्यानंतर बदलत्या परिस्थितीबाबत वसंत साठे म्हणतात,

**''१९४२-४३ नंतर युद्धाच्या सावल्यांनी सामान्य माणसांचे जनजीवन ढवळून निघाले. स्वातंत्र्यलढाही ऐन जोषात आला. परवाना पद्धती आली होती.'' ...१५**

अर्थातच परवाना म्हणजे रेशनिंगसारखी अवस्था त्यामुळे काळा बाजाराच्या धंद्याला ऊत आला. परवाना जादा पैसे घेऊन देणे घेणे आले. रॉ स्टॉकच्या किंमती भडकल्या डबल व्हर्जन तर परवडेनासे झालेच पण मराठी भाषेत चित्रपटनिर्मिती करणेही परवडेनासे झाले. याविषयी वसंत साठे पुढे म्हणतात-

**''युद्धापूर्वीच्या जीवन मूल्यांवरच** (Ethics) **मराठी चित्रनिर्मिती धडपडत सुरु होती. मराठी चित्रपट काढणे महागाईमुळे किफायतशीर होत नव्हते. हिंदी-मराठी डबल व्हर्जन बंद होऊन हिंदी चित्रपट काढण्याची व्यावसायिक गरज निर्माण झाली.'' ...१६**

म्हणजे कच्च्या फिल्मची उपलब्धता आणि तिची किंमत यावर मराठी चित्रपट निर्मितीचा प्रपंच उभा आहे.

किंमतीला परवडण्यासाठी बरेच निर्माते १६ मिलीमिटर फिल्मवर शुटींग करुन त्याचे ३५ मिलीमिटरमध्ये रुपांतर करीत होते. यालाच Blow up म्हणतात. अशा निघणाऱ्या फिल्मची प्रत तितकीशी चांगली नसते. शिवाय शासनाच्या नव्या अनुदानाच्या धोरणाप्रमाणे अनुदानाची प्रतवारी करताना ३५ मिलीमिटर, सिनेमास्कोप, डॉल्बी यांना वरची प्रतवारी व ३० लाखांपर्यंत अनुदान ठेवले आहे. याकारणाने १६ मिलीमिटर वर चित्रीकरण करुन ते Blow up करणेही किफायतशीर राहीलेले नाही.

तंत्रज्ञानाच्या नव्या शोधाचा एच्. डी. फॉर्म्यॉट हा फारच किफायतशीर ठरतो आहे. सरळ सरळ संगणकाच्या हार्ड डिस्कवर चित्रीकरण करुन घेण्याची पद्धतही किफायतशीर ठरते आहे. यामुळे फिल्मची गरजच कमी होणार आहे. आज डिजीटल कॅमेरे ज्याप्रमाणे वापरले जातात त्या पद्धतीप्रमाणे याला फिल्मची आवश्यकता नसल्याने मोठा खर्च वाचणार आहे. शिवाय पुन: पुन: चित्रीकरण करताना (Retake) फिल्म वाया जाण्याचीही समस्या संपुष्टात येत चालली आहे. महत्त्वाचे म्हणजे एकाच वेळी असंख्य चित्रपटांच्या पडद्यावर इंटरनेटद्वारे प्रक्षेपण करता येणेही शक्य झाले आहे. त्यामुळे फिल्मचे डबे इकडून तिकडे नेणे, प्रिंटस् काढण्याचा फिल्मचा खर्च या सगळ्यांत बचत होण्याचे दिवस आहेत.

तरीही यातून डोकावणारी एक समस्या आहेच. फिल्मव्यतिरिक्त केलेलं चित्रीकरण अनुदानासाठी पात्र आहे की नाही याविषयी मतमतांतरे आहेत. १००% ही प्रणाली स्विकारायची किंवा नाही याविषयी बरीच साधकबाधक चर्चा आहे.

**(७) चित्रपट वाहिन्यांचा सुकाळ आणि सुळसुळाट-** पूर्वी दूरदर्शनची स्पर्धा चित्रपटांना होती पण आता दिवसागणिक नवे नवे चॅनल्स (वाहिन्या) येत आहेत. त्यावर विविध प्रकारचे कार्यक्रम, चित्रगीते, मुलाखती, कलाकार-तंत्रज्ञांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घडविणारे Reality show याशिवाय सतत विविध चित्रपटांचे प्रक्षेपण याचा प्रचंड प्रभाव म्हणजे चित्रपटगृहांकडे जाणारा प्रेक्षक घरातच रोखला गेला.

घरबसल्या, घरातली कामं करता करता, एकाचवेळी कुटुंबियांसमवेत बीन खर्चाची करमणूक सोडून चित्रपटगृहाकडे कोण वळणार? मुळात आज कुटुंबातील लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत अनेक प्रकारे आपआपल्या जरुरीच्या कामात व्यस्त आहे. या कामातून वेळ मिळेल तेव्हा आणि घरी असेल तेव्हा टी.व्ही. समोर बसून आवडते कार्यक्रम बघणे त्याला जमू शकते. कधी कधी चित्रपटगृहांपेक्षाही त्याला घरबसल्या मिळालेली करमणूक सोयीची आणि किफायतशीर वाटते.

आज एका कुटुंबाला चित्रपट पाहायचा झाल्यास मुद्दाम वेळ काढणे गरजेचे आहे. इतकेच नव्हे तर रीक्षा इ. वाहनांचा खर्च आणि मग इतक्या लोकांचे चित्रपटगृहाचे तिकीट काढणे आले. शिवाय मराठी चित्रपटगृहांना मिळणारी काही चित्रपटगृहे असुविधा जनक व गलीच्छ स्वरूपात आहेत.

टी.व्ही. वरील मालिकांनी अशा प्रकारचे संकट जरी चित्रपटांवर आणलं असलं तरी काही चांगल्या व फायद्याच्या गोष्टीही घडल्या आहेत. उदा. इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे हक्क विकून आज मराठी चित्रपट निर्मात्याला चांगली रक्कम मिळते आहे. म्हणजे फायदा आणि होणारा तोटा याचा ताळमेळ कसा घालायचा हे कसरतीचे काम, हा निर्णय त्यानेच ठरवायचा आहे.

मुलाखत घेत असताना चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शन, लेखक श्री. चंद्रकांत जोशींनी या संदर्भात आशादायक विचार मांडला-

**‘‘प्रथम लोक टी.व्ही. च्या पूर्ण प्रेमात पडले होते, नंतर हळूहळू टी.व्ही.ची क्रेझ कमी कमी होत चालली आहे. एक दिवस टी.व्ही. च्या छोट्या पडद्यावर**

**चित्रपट पाहण्यापेक्षा चित्रपटगृहात बसून मोठ्या पडद्यावर चित्रपट पाहणे लोक पसंत करतील आणि हळूहळू आता प्रेक्षकांचा कल चित्रपटगृहांच्या बाजूने होत चाललेला आहे. ...१७**

**(८) नाटकांशी स्पर्धा** - मराठी चित्रपटांचा पायाच नाटकांनी घातलेला आहे. मराठी माणूस आणि मराठी मन नाट्यकलेत आणि संगीतात रमणारं आहे. सुरुवातीच्या काळात संगीत नाटकांचा प्रचंड पगडा मराठी मनावर होता. मूकपट सुरु झाल्यानंतर फारसा प्रभाव नाटकांवर पडला नाही.

बोलपटाचे युग सुरु झाले आणि बोलपट जीवनानुभवाशी जवळीक साधायला लागले. त्यातच मराठी रंगभूमीवरील तंत्रज्ञ आणि कलाकार यांनी बोलपटात प्रवेश केला आणि मग बोलपटाचे पारडे नाटकापेक्षा जड होऊ लागले.

मधल्या काळात हिंदीशी स्पर्धा आणि कलात्मक दर्जेदार नाटकांशी स्पर्धा आणि कलात्मक दर्जेदार नाटकांशी स्पर्धा त्या दुहेरी कार्यात मराठी चित्रपट सापडला कारण रंगभूमीचा कर शासनाने माफ केला. हिंदीचा झगमगाट हा कायमचाच आहे. त्यांच्या इतकी आर्थिक ताकद लावणे मराठीला शक्य नव्हते.

दूरदर्शन आणि निरनिराळ्या वाहिन्या यांच्याकडे प्रेक्षक आकृष्ठ झाल्याने नाटके आणि मराठी चित्रपट यांचा व्यवसाय अडचणीत आला.

कलात्मक दर्जा चांगला राखून प्रेक्षकांना आकृष्ठ करण्याचे सर्व मार्ग अवलंबणे हाच यावरील उपाय आहे.

याबाबतीत मराठी चित्रपटांचे एक अनुभवी निर्माते म्हणतात की,

**''१९७१ साली शांतारामबापूंनी 'पिंजरा' दिग्दर्शित केला तेव्हा त्यांच्या बोलण्यातून सतत येत असे. मराठी रंगभूमीवर जे पहायला मिळणार नाही ते मराठी सिनेमात पहायला मिळेल तरच प्रेक्षक येईल.'' ...१८**

**(९) जाहिरात, वितरण आणि प्रकाशनाच्या समस्या**- कोणताही माल तयार करण्यापेक्षा त्याचे मार्केटिंब करुन खपविणे हे अवघड आहे. मराठी चित्रपट व्यवसायही याला अपवाद नाही. जाहीरातीचे खर्च दिवसेंदिवस वाढत चाललेले आहेत.

मराठी चित्रपट निर्माते चित्रपटाची निर्मिती झाली की, सारे संपले या थाटात राहतात. त्यानंतरच खरी जबाबदारी सुरू होते याचे भान कित्येकजण बाळगत नाहीत. निर्मितीसाठी

जेवढा खर्च होतो त्याच्या किमान काही प्रमाणात खर्च जाहीरात, वितरण, प्रदर्शन यासाठी करावा हे ते का लक्षात घेत नाहीत हा खरा प्रश्न आहे.

'बिनधास्त'सारख्या चित्रपटाच्या निर्मिती खर्चापेक्षा जाहीरात आणि वितरण व प्रकाशन यावर निर्मात्यांनी भरपूर पैसा खर्च केला आणि त्याचे सुपरीणाम त्यांना अनुभवायला मिळाले. जाहीरात कशी करावी याचा त्यांनी एक नवा मापदंड तयार केला.

ज्यांची स्वत:ची वितरण व्यवस्था होती ते या धंद्यात तरले आणि टिकले हा आजपर्यंतचा अनुभव आहे. सरकारने प्रसिद्धीसाठी मदत करावी, सरकारी मालकीचे होर्डिंग्ज मराठी चित्रपटांसाठी उपलब्ध करून द्यावेत असे दिग्दर्शक रणदिवे यांचे मत आहे.

निर्माता-वितरक आणि प्रकाशक किरण शांताराम यांनी खूप उद्बोधक भाष्य केलं आहे ते म्हणतात-

**''मराठी चित्रपटसृष्टीतील निर्माते, दिग्दर्शक, कलावंत, तंत्रज्ञ यांनी एकत्र येऊन एक को-ऑपरेटीव्ह स्थापन करून त्याद्वारे सर्व मराठी चित्रपटांचे वितरण केलं तर फायदा होऊ शकतो. यासाठी सगळ्यांनी एकत्र येणं गरजेचं आहे. पाय खेचण्याची वृत्ती सोडून द्यायला हवी. याच सोसायटीतर्फे पुढील भविष्यात ठिकठिकाणी चित्रपटगृहे बांधून ती चालवता येतील. या कामी शासन देखील मदत करु शकते.''...१९**

परंतु निर्माते सतीश कुलकर्णी नेमकं याच्या उलट मत मांडतात-

**''मराठी चित्रपटाच्या वितरणाची समस्या को ऑपरेटीव्ह स्थापन करुन सुटणार नाही. मुळात चित्रपटगृहाचं भाडं वाढलेलं आहे; तुम्ही एकट्याने गेलात काय किंवा को-ऑपरेटीव्हतर्फे गेलात काय, थिएटरमालक भाडी थोडीच कमी करणार आहेत? त्यामुळे को-ऑपरेटीव्ह वगैरे स्थापन करुन काही होणार नाही. वितरणाऐवजी सहकारी तत्त्वार चित्रपट निर्मिती मात्र होऊ शकते.'' ...२०**

वितरण आणि प्रदर्शनाची समस्या मराठी चित्रपटाच्या बाबतीत दिवसेंदिवस कशी कठीण होत चालली आहे हेच या सर्वांचा विचार करता दिसून येते. एकंदरीत विचार करता निर्माते विजय नेवाळकर असे मत मांडतात की,

**''मराठी चित्रपटांच्या व्यावसायिक जडणघडणीचा विचार करायला मराठी**

**निर्मात्यांना बळ नाही की वेळ नाही की एकत्र येण्याची गरज वाटत नाही. प्रेक्षक वाढला तर व्यवसाय भरभराटीला येईल आणि व्यवसाय भरभराटीला आला तर कलात्मक चित्रपटांची निर्मिती वाढेल.'' ...२१**

वरील विधानातच समस्येचं उत्तर दडलेलं आहे. चित्रपट निर्मिती ही एक संघभावनेनं यशस्वी करण्याची व्यावसायिक कला आहे. संघातील सर्व घटकांचे परस्परांशी सख्य, सामंजस्य आणि सहकार्याची भावना हीच मराठी चित्रपट निर्मितीतील समस्या सोडवून हा व्यवसाय उर्जितावस्थेला आणण्यात सहाय्यभूत होईल.

**(१०) प्रेक्षकांची उदासीनता -** चित्रपट निर्मितीचा हा प्रंपच करायचा तो प्रेक्षकांसाठी प्रेक्षकांनी भरभरुन प्रतिसाद दिला तर चित्रपटगृहात उत्पन्न मिळेल. तसं झालं तर निर्माते तरतील. चित्रपटनिर्मिती व्यवसाय तरेल, कलाकार, तंत्रज्ञ इ. घटकही तरतील. याचा सरळ अर्थ असा की, सगळ्यांचा मूळाशी आहे प्रेक्षकांचा प्रतिसाद.

प्रेक्षकांना नवीन काहीतरी, चांगलं पहायला आवडतं. अर्थात् हवामान खाते जसे अनेक शास्त्रीय कसोट्या वापरुनसुद्धा पावसाचा अंदाज देऊ शकत नाही त्याप्रमाणे नेमका कोणता चित्रपट गर्दी खेचेल याचा अंदाज कोणालाही देता येत नाही.

चित्रपटाच्या सर्व तांत्रिक बाजू चांगल्या असून कथा-पटकथा-संवाद-संगीत इ. गोष्टीही चांगल्या असून चित्रपट साफ कोसळल्याची अनेक उदाहरणे आहेत. याउलट सर्व गोष्टी जेमतेम असूनही चित्रपटांनी उच्चांकी यश मिळविल्याचीही उदाहरणे आहेत.

असे जरी असले तरी चित्रपट निर्माता- दिग्दर्शकांनी काही बाबींकडे आवर्जून लक्ष दिले पाहिजे. पहिलं महत्त्वाचं म्हणजे कथा, पटकथा, संवाद, गीते या बाजू नाविन्यपूर्ण आणि समाजमन आकर्षित करेल अशा हव्या. दिग्दर्शन उठावदार असणे गरजेचे आहे. सर्व निर्मितीमूल्यांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. चांगल्यात चांगलं देण्याचा प्रामाणिकपणा सुजाण प्रेक्षकांच्या नक्कीच लक्षात येतो. यानंतरच्या बाबी म्हणजे जाहीरात वितरण आणि प्रदर्शन याची चर्चा यापूर्वी केलेलीच आहे.

त्याचप्रमाणे आयता प्रेक्षकवर्ग मिळेल यापेक्षा प्रेक्षकवर्ग तयार करणेही महत्त्वाचे. हे मार्केटींगचे तत्व आहे. ग्राहकाला गरज निर्माण करुन दाखवून विक्री वाढविता आली पाहिजे. तसे वेगवेगळ्या वयाचे प्रेक्षक, वेगवेगळ्या व्यवसायाचे प्रेक्षक थोडक्यात वेगवेगळ्या आवडीनिवडीचे प्रेक्षक गोळा करता येणं ही एक कला आहे. सुमित्रा भावे

यांनी या तत्त्वावर '१० वी फ' साठी प्रेक्षकवर्ग मिळवला आणि मग मिळालेला प्रेक्षकवर्ग टिकविण्याचा प्रयत्न केला. शाळा-शाळांमध्ये जाऊन आणि सवलती देऊन अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी चित्रपटगृहाकडे वळविले व अशा रितीने एक नवाच प्रेक्षक वर्ग चित्रपटासाठी निर्माण केला, जो कधीही चित्रपटगृहाकडे फिरकू शकला नसता. व्यापाराच्या दृष्टीकोनातून ग्राहक निर्माण करणे या तत्त्वावरच चित्रपट व्यवसायासाठी प्रेक्षकवर्ग निर्माण करणे याचे हे एक आगळे वेगळे पण आदर्श घेण्यासारखे उदाहरण म्हणता येईल.

**(११) माध्यमांची उदासिनता** - समाजातील विचारवंत वर्ग उदा. शिक्षक, प्राध्यापक, पत्रकार इ. लोक हे मत बनविणारे असतात. हे कलाविष्काराबाबतीत टिकाटिप्पणी करुन रसिकांना प्रोत्साहीत करतात. किंवा कधी कधी परावृत्तही करतात. पत्रकार सातत्याने माध्यमातून चित्रपटांविषयी सकारात्मक किंवा नकारात्मक लिखाण करत असतात.

चित्रपटाविषयीचे परीक्षण, समिक्षण, रसग्रहण यांचा प्रत्यक्षात प्रेक्षकवर्गावर कितपत परिणाम होतो हा विषय वादाचा आहे. याला दोन्हीही बाजू आहेत.

परंतु एक सामाजिक भान म्हणून आणि मराठी चित्रपट व्यवसायाला सहकार्य म्हणून किमानपक्षी उठसूट टिकाही करु नये ही माफक अपेक्षा आहे. मराठी चित्रपट निर्मिती यशाची करण्याच्या दृष्टीने खारीचा वाटा या चमूलाही उचलता येऊ शकतो.

समाजाला शिक्षण देणे, प्रबोधन करणे नव्या नव्या दिशेने कलाविष्कारांची माहीती देणे ही जबाबदारी जाणकार पत्रकारांची आहे. ते प्रेक्षकांना चित्रपट बघण्याचं, समजून घेण्याचं, रसास्वाद घेण्याचं ज्ञान देऊन त्यांना चित्रपट पाहण्यास उद्युक्त करु शकतात. या दृष्टीने पत्रकारांचे फार मोठे योगदान मराठी चित्रपट व्यवसायाला मिळू शकेल.

**(१२) स्टार कलावंत आणि तंत्रज्ञांची मनमानी** - कलाकार आणि महत्वाचे तंत्रज्ञ सुद्धा स्ट्रगल करत करत नावारुपाला येतात. मग त्यांना स्टार व्हॅल्यू यायला लागते. पूर्वी सोसलेल्या त्रासाची प्रतिक्रिया आता उमटायला लागते. पूर्वीची मानहानी, संभावना, जाणता-अजाणता आपल्याकडे झालेले दुर्लक्ष, यामुळे कधी कधी अशा स्टारमध्ये स्वभावात कटुता येत राहते. अव्वाच्या सव्वा सवलती मागणे, चित्रीकरणाच्या वेळा न पाळणे, प्रॉडक्शनच्या गाड्यांचा आणि साहित्याचा गैरवापर करणे, मित्र-मैत्रिणी, नातलग

तसेच पाळीव प्राणी यांचा खर्च निर्मात्यावर टाकणे, असे अनेक गैरप्रकार अनुभवाला येतात. एकमेकांतील सामंजस्य यातून नष्ट होते. चित्रीकरण रखडते आणि अनावश्यक खर्च वाढतात. पर्यायाने चित्रपट निर्मितीच्या सर्वच घटकांवर यांचा दुष्परिणाम होतो.

'एकाने गाय मारली म्हणून दुसऱ्याने वासरु मारावे,' या पद्धती चित्रपट निर्मितीसारख्या सामाजिक बांधिलकीच्या व्यवसायाला घातक आहेत. हे सर्व संबंधितांनी समजून आणि उमजून घेतले पाहिजे. सर्व संबंधितांनी एकमेकांना समजून घेणे आणि सामंजस्याने वागणे यामुळे या समस्या सुटतील.

## ५.७ समारोप -

चित्रपट हा समाजाचा अविभाज्य भाग आहे. चित्रपट म्हणजे आपल्या संस्कृतीचे चित्रण आहे. त्यामुळेच तो संस्कृतीचा ठेवा आहे असे म्हटले जाते, त्यामुळे चित्रपट व्यवसाय सुस्थितित राहणे निकोप समाजयंत्रणेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे.

या प्रकरणात निरनिराळ्या प्रकारांनी मराठी चित्रपट व्यवसायांसमोरील अडचणींचा, समस्यांचा अभ्यास केला. त्यातून समस्यांचा शोध घेऊन या समस्या निवारणाचे उपाय कोणते हे विविध ग्रंथातून आणि तज्ज्ञांच्या लेखनातून व प्रत्यक्ष मुलाखत, प्रत्यक्ष चर्चा करुन शोधले.

समस्या निवारण्यासाठी मराठी चित्रनगरी व अखिल भारतीय चित्रपट महामंडळ यांचा सहभागही मोलाचा आहे. विविध शासकीय व अशासकीय संघटनाही मोलाचं कार्य करु शकतात.

नाट्य प्रशिक्षण, चित्रपटांच्या विविध विभागांसाठी प्रशिक्षण इ. गोष्टी चित्रपट चळवळींमार्फत राबविता येतात. कलामहर्षि बाबूराव पेंटर फिल्म सोसायटी अशा सारख्या संस्था रसिकांना मार्गदर्शन करु शकतात.

एकूणच प्रेक्षकवर्गाला चित्रपट कसा पहावा? समजून कसा घ्यावा? इ. चे ज्ञान देणे गरजेचे आहे.

चांगली गोष्ट म्हणजे सध्याची पिढी अतिशय हुशार आहे. लहान लहान मुलेसुद्धा संगणक, मोबाईल, व्ही.सी.डी., डी.व्ही.डी. यांचा चांगल्या तऱ्हेने वापर करायला शिकली आहेत. म्हणूनच अगदी लहान वयातच, शाळेपासून या अशा विद्यार्थ्यांना नाट्य

आणि चित्रपट कलेचं प्रशिक्षण देणं गरजेचे आहे. त्यांना त्यांच्या वयोमानाला झेपेल त्या पद्धतीने तंत्रज्ञानही शिकविले पाहीजे, तर उद्याचे जाणकार यातूनच घडतील.

यानंतर प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा आणि विद्यापीठ स्तरावर क्रमाक्रमाने विद्यार्थ्यांची कलाविषयक जाणीव समृद्ध करणे गरजेचे आहे. विविध स्पर्धांतून, कार्यक्रमातून, स्वयं अध्ययनातून हे विद्यार्थी तयार होणे गरजेचे आहे.

आवडीने केलेले काम, मनापासून केलेले काम केव्हांही अत्यंत चांगले होते. अशा कामात कितीही श्रम केले तरी व्यक्ती थकत नाही, कंटाळत नाही. म्हणूनच चित्रपट निर्मिती व्यवसायाच्या सगळ्या अंगांबाबत रसिकांमध्ये आवड निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे.

पुढील अध्यायात निष्कर्षाबाबत चर्चा केलेली आहे.

***

## संदर्भ सूची


१. मॅक्लुहान मार्शल - 'अंडरस्टँडिंग मिडीया,' पृष्ठ क्र. १४२.

२. शेवाळे माधव - भारतीय चित्रपट - नीहारा प्रकाशन, पुणे. १९९३, पृष्ठ क्र. १५२.

३. शेवाळे माधव - तदेव - पृष्ठ क्र. १५२.

४. शेवाळे माधव - तदेव - पृष्ठ क्र. १४७.

५. शहा पन्ना - 'द इंडियन फिल्म मोशन पिक्चर सोसायटी ऑफ इंडिया, १९७५,' पृष्ठ क्र. ७.

६. गारखेडकर विशाखा - पीएच् डी. चा प्रबंध -''हिंदी कलात्मक चित्रपटातून साधला जाणारा जनसंवाद''- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठ - २००२. पृष्ठ क्र. १३.

७. अशोक राजवाडे - कौल - शहानी, बेनेगल निहलानी आणि नवसिनेमा -अभिरूची दिवाळी १९८६. पृष्ठ क्र. ११९.

८. कलामहर्षि बाबूराव पेंटर - लेखक-ग. रं. भिडे, बाबा गजबर- मीनल प्रकाशन, कोल्हापूर, १९७८. पृष्ठ क्र. ५६.

९. तदेव - पृष्ठ क्र. ५६

१०. भावे सुमित्रा - माझे चित्रपट जीवन - शद्बांकन - मनीषा कावतकर - स्त्री विकासाचे नवे क्षितिज, विभाग ६ वा. पृष्ठ क्र. ७४०.

११. पवार सुधाकर, वृत्तपत्र व्यवसाय काल आणि आज - प्रकाशक - प्रमोद पवार, नासिक, १९८६. पृष्ठ क्र. ९९.

१२. तळवलकर स्मिता - वास्तव रुपवाणी - मराठी चित्रपट विशेषांक, २००३. प्रकाशक - प्रभात चित्र मंडळ, मुंबई. पृष्ठ क्र. २३.

१३. नेवाळकर विनय - तदेव - पृष्ठ क्र. २३.

१४. कुलकर्णी सतीश - तदेव - पृष्ठ क्र. १८.

१५. साठे वसंत - बखर सिनेमाची - प्रकाशक - किरण व्ही. शांताराम, मुंबई, १९९२. पृष्ठ क्र. ११९.

१६. तदेव - पृष्ठ क्र. ११९.

१७. जोशी चंद्रकांत - प्रत्यक्ष मुलाखत - १९ मे, २००९.

१८. नेवाळकर विनय - तदेव - वास्तव रुपवाणी, पृष्ठ क्र. २३.

१९. किरण व्ही. शांताराम - वास्तव रुपवाणी - तदेव. पृष्ठ क्र. १८.

२०. कुलकर्णी सतीश - तदेव - वास्तव रुपवाणी. पृष्ठ क्र. १९.

२१. नेवाळकर विनय - तदेव - वास्तव रुपवाणी. पृष्ठ क्र. २३

□□□